# महिला प्रभाव नेटवर्क

# शिष्यत्व मॅन्युअल १

सादरकर्ते :

असोसिएशन फॉर इंटरनॅशनल

डिसायपलशिप ॲडव्हान्समेन्ट (एइडा)

**एज्युकेशनल रिसोर्सेसच्या** सहयोगाने

**नाव :** ______________________

**ठिकाण :** ______________________

**राज्य :** ______________________

**दिनांक :** ______________________

# WIN DISCIPLESHIP MANUAL

## (Marathi)

Copyright ©
Association for International Discipleship Advancement,
(AIDA), New Delhi, India
2014

*हे मॅन्युअल महिला प्रभाव नेटवर्क (विमेन्स इम्पॅक्ट नेटवर्क – विन) यांच्यासाठी असून, ते ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्या म्हणून स्वतःचे समर्पण/पुनःसमर्पण करण्यासाठी महिलांना आवाहन करते. आणि मग या महिलांनी गतीशील, पवित्र शास्त्राधारित आध्यात्मिक संघटनकार्याच्या योगे इतर महिलांना प्रभावित करावे यासाठी साहित्य आणि व्यावहारिक योजना यांद्वारे त्यांना सुसज्ज करते, यासाठी की अविश्वासणाऱ्यांना ख्रिस्ताकडे आणावे, आणि समर्पित शिष्यत्वासाठी त्यांचे संगोपन करावे.*

*Following are the names of those from ER/AIDA who have written material for this Discipleship Manual:*

*Rev. Shanta Rawate*
*Mrs. Rhonda Dragomir*
*Mrs. Caroline Akbar*
*Mrs. Sheba Baiju*
*Mrs. Martha Sparks*
*Rev. Stephen Liversedge*
*Rev. Roland Bowman*
*Rev. Paul Braun*
*Rev. Stephen Rawate*

**NOT FOR SALE: FOR PRIVATE CIRCULATION ONLY**

***Printed at : NEW LIFE PRINTERS (P) LTD, Delhi, Ph. : 011-27659883***

# अनुक्रमणिका


समर्पण

१. शिष्यत्वाचा आदेश ........................................ ५

२. शिष्याची गुणलक्षणे ........................................ ११

३. बेथानीची मरीया : एक चांगली शिष्या ........................................ १९

४. शिष्याची जीवनशैली ........................................ २५

५. ख्रिस्तामध्ये ........................................ ३५

६. शिष्या आणि तिचे नातेसंबंध ........................................ ३९

७. शिष्या आणि आत्मे जिंकणे ........................................ ४७

आत्मे जिंकण्याची कारणे, ........................................ ४७

तुमची वैयक्तिक साक्ष, ........................................ ४९

पाच बोटांच्या साहाय्याने सुवार्ताप्रसार, ........................................ ५२

तारणाचा रोमकरांस पत्रातील मार्ग, ........................................ ५४

शब्दरहित पुस्तक, ........................................ ५५

८. शोमरोनी स्त्री : आत्मे जिंकणारी/साक्षीदार ........................................ ६१

९. नामी आणि रूथ : चांगल्या शिष्यत्वासाठी संगोपन ........................................ ६७

१०. प्रिस्किल्ला : शिष्या बनवणारी ........................................ ७३

११. विन आणि विनर्स ........................................ ७९

१२. विन गटाचे नेतृत्व करणे ........................................ ८३

परिशिष्ट ........................................ ८८

# समर्पण



थेल्मा 'मम्मा'' ब्राऊन या त्यांच्या वाढदिवसाच्या काही दिवस अगोदर १३ ऑगस्ट २००९ रोजी प्रभूघरी गेल्या. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी तीन मंडळ्यांचे पाळक म्हणून सेवा सुरू केली, आणि कॉलेजचे शिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांनी आपले पती डॉ. विलीस के. ब्राऊन यांच्यासोबत ४५ वर्षे आफ्रिकेमध्ये मिशनरी म्हणून कार्य केले.

भारतामध्ये एइडा विमेन्स कॉन्फरन्सेसचे (एइडा महिला परिषदा) सेवाकार्य त्यांनीच सुरू केले. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या तीन वर्षांत त्यांना स्वादुपिंडाच्या कर्करोगाचा त्रास होता, तरी महिलांना साक्ष देण्याच्या आणि सुवार्ताप्रसार करण्याच्या कार्यासाठी सज्ज करावे म्हणून त्यांनी भारतातील निरनिराळी राज्ये, तसेच नेपाळ, बांगलादेश आणि म्यानमार या देशांत प्रवास केला. व्यासपीठावरील त्यांची केवळ उपस्थितीसुद्धा महान संदेश आणि प्रेरणा अशी होती.

त्यांच्या जीवनाचा इतरांवर कसा प्रभाव पडला हे पुढील काही अभिप्रायांवरून लक्षात येते :

''मम्मा ब्राऊन या वयातही प्रभूची सेवा करू शकतात हे पाहिल्यावर, मीही कधीही, कोठेही, कोणत्याही परिस्थितीत आणि कोणत्याही वयात देवाची सेवा करण्यास सक्षम असले पाहिजे हे मी शिकले.'' (रेव्ह. जेन थॉमस, हिमाचल प्रदेश)

''प्रभूचे कार्य करण्यासाठी मम्मा ब्राऊन जर सात समुद्र पार करू शकतात, तर आपणसुद्धा चर्चमध्ये कार्य करत राहिले पाहिजे असा ठाम निश्चय मी केला आहे.'' (रोशनी फिलिप्स, वाराणसी, उ. प्र.)

''आमच्यामध्ये अतिशय चांगल्या प्रकारे मिळूनमिसळून दिवसभर बसून आम्हांला मार्गदर्शन करणाऱ्या मम्मा ब्राऊन यांना पाहिल्यानंतर सुवार्ताकार्य करण्यासाठी मला खूप उत्तेजन मिळाले.'' (कॅरलिन अकबर, नागपूर, महाराष्ट्र)

मम्मा ब्राऊन यांच्या अखेरच्या संदेशातील शब्द असे होते, **''सुवार्ताप्रसाराचे कार्य संपलेले नाही. ते अजूनही करण्याची गरज आहे. या पृथ्वीवर आपल्यावरील सर्वांत मोठी जबाबदारी म्हणजे आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा संदेश गाजवणे ही आहे, मग तो पेरू किंवा प. बंगालमध्ये असो किंवा प्रभूविषयी ऐकण्याची प्रतीक्षा करणाऱ्या कोणत्याही देशात असो! लक्षात ठेवा, कार्य अजून पूर्ण झालेले नाही. सुवार्ता गाजवण्यासाठी तुम्ही जे काही करू शकता ते करत असताना देव तुम्हांला आशीर्वादित करो.''**

खरोखर, सुवार्ताप्रसाराचे कार्य अजून संपलेले नाही! येशू ख्रिस्ताच्या प्रत्येक शिष्याने त्याचे साक्षीदार झाले पाहिजे. प्रत्येक खऱ्या शिष्यत्वाचे हे अत्यावश्यक गुणलक्षण आहे की, त्याने किंवा तिने इतरांना ख्रिस्ताकडे आणले पाहिजे. देवाच्या कृपेच्या योगाने प्रत्येक विनरने आत्मे जिंकणारे – त्याच्यासाठी विपुल फळ देणारे व्हावे अशी आमची प्रार्थना आहे (योहान.१५:१–२,६).

# १ शिष्यत्वाचा आदेश

**मुख्य वचन : १ करिंथ.९:१९**

''कारण मी सर्वांपासून स्वतंत्र असताही अधिक लोक मिळवण्यासाठी स्वतःला सर्वांचा दास असे केले आहे.''

येशूने त्याच्या शिष्यांना दिलेली आज्ञा, **''तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा...**'' (मत्तय.२८:१९). शिष्य या शब्दाचा अर्थ शिकणारे, ज्यांना शिकवले जाते ते, असा होतो. पवित्र शास्त्राच्या काही भाषांतरांत **''तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिकवा...'' असे म्हटले आहे. या शिकवण्याचा उद्देश काय ते** २० व्या वचनात सुस्पष्ट केले आहे : ''**जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा...**'' येशू ख्रिस्ताचे शिष्य केवळ त्याची शिकवण शिकतात असे नाही, तर तिचे आज्ञापालनदेखील करतात. आणि त्याच्या शिकवणीत महान आज्ञेचा समावेश आहे, म्हणून जे इतरांना शिष्य करतात आणि त्याने जे काही आज्ञापिले ते पाळायला शिकवतात तेच खरे शिष्य आहेत.

येशू ख्रिस्ताचे पृथ्वीवरील सेवाकार्य चालू असताना, त्याचे अनुसरण करणारे पुष्कळजण होते. आरोग्य मिळावे म्हणून लोकांचे थवेच्या थवे त्याच्याभोवती जमा होत असत (मत्तय.८:१६). लोक त्याच्या मागे येत कारण त्यांनी त्याने केलेले चमत्कार पाहिले होते (योहान.६:२). त्याला अनुसरणाऱ्या पुष्कळजणांनी म्हटले की, ''आम्हांला त्याचे शिष्य होऊन त्याच्यापासून शिकायचे आहे.'' कालांतराने बरेच जण त्याला सोडून गेले (योहान.६:६६). पण, आपले सर्वकाही सोडून देऊन, त्याचे पृथ्वीवरील जीवन संपेपर्यंत, एवढेच नाही, तर त्यांचे स्वतःचे जीवन संपेपर्यंत जे त्याला अनुसरले तेच त्याचे खरे शिष्य होते (माक.१०:२८). ते त्याच्यामागे गेले आणि जिव्हाळ्याने त्याच्यासोबत राहिले, त्याच्यापासून सखोल सत्ये शिकले, आणि त्याच्यासाठी ''माणसे धरणारे'' झाले.

अमेरिकन ट्रॅक्ट सोसायटी डिक्शनरीच्या मते ''ख्रिस्ताचा शिष्य'' याची व्याख्या आता अशी करता येईल : ''जी व्यक्ती ख्रिस्ताच्या सिद्धान्ततत्त्वांवर विश्वास ठेवते, त्याच्या बलिदानावर विसंबून राहते, त्याचा आत्मा आत्मसात करते, त्याच्या उदाहरणाचे अनुसरण करते, आणि त्याचे कार्य करण्यासाठी जगते अशी व्यक्ती.'' यावरून शिष्यत्व हे तारणानंतरचे पुढचे पाऊल आहे हे लक्षात येते. तारण ही शिष्य होण्याची केवळ सुरुवात आहे. तारण होण्यासाठी व्यक्ती ख्रिस्तावर विश्वास ठेवते. तारण हे केवळ '**'कृपेने... विश्वासाच्या द्वारे'' आहे. ''आणि हे तुमच्या हातून झाले असे नाही, तर हे देवाचे दान आहे**'' (इफिस.२:८). पण शिष्यत्वाची प्रक्रिया ही आमचा आदर्श असलेला तारक प्रभू याच्याप्रमाणे आणि त्याने दिलेल्या आज्ञांनुसार तसेच मृत्यूने आम्हांला त्याच्या सहभागितेत नेईपर्यंत त्याच्याशी विश्वासू राहून त्याची सेवा करण्यासाठी आमच्या जीवनांची जडणघडण करावी यासाठी आहे.

शिष्यत्वामध्ये विश्वासणाऱ्याने शिस्तपालन करण्याची आणि समर्पण करण्याची गरज असते. शिष्यत्वामध्ये शिकवणे आणि शिकणे या दोन्ही गोष्टींचा समावेश होतो. शिष्य करणारा शिकवतो आणि जो शिष्य होणार असतो तो शिकतो. ख्रिस्ताने त्याच्या शिष्यांना कसे शिकवले हे आपण चार शुभवर्तमानांत वाचतो. ख्रिस्ताची जी शिकवण प्रेषितांनी शिकवली त्यामध्ये नवीन विश्वासणारे कसे दृढ किंवा खंबीर राहिले हे आपल्याला प्रेषितांची कृत्येमध्ये वाचायला मिळते. शिष्यांनी इतरांना शिष्य केले; आणि त्या सर्वांना ख्रिस्ती हे नाव देण्यात आले (प्रे.कृ.११:२६). उर्वरित नवा करार हा ख्रिस्ती शिष्यांसाठी देवाचे वचन होता (आणि आहे). अशा प्रकारे शिष्यत्व म्हणजे ख्रिस्ताने निश्चित केलेल्या आराखड्याप्रमाणे – पवित्र शास्त्रात वर्णन केलेल्या जीवनशैलीनुसार जगणे.

तारण केवळ देवाकडून आहे, त्याउलट शिष्यत्व म्हणजे देव आणि आपण यांच्यामधील भागीदारी होय. देवाकडून आपले तारण केले जाते तेव्हा आपण देवाच्या आत्म्याने भरले जातो, आणि देवाला संतोष देणारे जीवन जगण्यासाठी हा आत्मा आपल्याला सक्षम करतो (योहान.१४:२६; प्रे.कृ.५:३१; १ करिंथ.१२:३ब). आपले स्वतःचे तारण करण्यासाठी आपण काहीही करू शकत नसलो, तरी शिष्य बनण्यासाठी पवित्र आत्मा आपल्याला शक्ती प्रदान करतो तेव्हा आपण काहीतरी केलेच पाहिजे. पवित्र शास्त्र म्हणते की, पवित्र आत्मा येशूविषयी साक्ष देईल, आणि त्याचा गौरव करील (योहान.१५:२६; १६:१३–१४). जोपर्यंत पवित्र आत्म्यासोबत आपली सक्रीय भागीदारी आणि सहकार्य नसेल तोपर्यंत आपण चांगले शिष्य होऊ शकणार नाही. शिष्यत्वासाठी ज्याची गरज आहे ते करण्यासाठी

पवित्र आत्मा आपल्याला सक्षम करील. आपल्या जीवनात देवाच्या वचनाचा उपयोग करून तो हे साध्य करतो (योहान.१६:१३–१५).

तुम्हांला येशू ख्रिस्ताचे शिष्य व्हायचे असेल, तर त्याचे शिष्य होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी तुम्ही देवाच्या वचनातील मार्गदर्शनानुसार आणि पवित्र आत्म्याच्या मदतीने शिकू शकाल. स्वतःचा वधस्तंभ उचलून आणि स्वतःचा नाकार करून त्याला अनुसरणारे तुम्ही आहात (माक.८:३४). देवाची तारणदायी कृपा समजून आणि तिचा अनुभव घेऊन, तुमची शरीरे जिवंत, पवित्र व देवाला ग्रहणीय यज्ञ म्हणून अर्पण करणारे तुम्ही आहात (रोम.१२:१). जग आणि जगातील गोष्टींवर प्रीती करण्याचे थांबवणारे तुम्ही आहात (१ योहान.२:१५). या जगाच्या सवयी, पद्धती, तत्त्वज्ञान किंवा रूढीपरंपरा यांना बळी न पडता देवाच्या परिपूर्ण इच्छेनुसार जगण्याचा निश्चय करणारे तुम्हीच आहात (रोम.१२:२). जेव्हा तुम्ही स्वतःचे समर्पण करता आणि तुमची जीवनशैली ख्रिस्तासारखी व्हावी म्हणून पवित्र आत्म्याला तुमच्यामध्ये कार्य करू देता, तेव्हा ज्या देवाने तारणाचे चांगले काम तुमच्यामध्ये सुरू केले, तो देव ते नक्कीच पूर्णत्वास नेईल (फिलिप्पै.१:६). आणि ख्रिस्तासारखे चारित्र्य एवढेच तुमच्या शिष्यत्वाचे फळ असणार नाही, तर ज्यांना ''माणसे धरणारे कराल'' असे अनेक शिष्य हे तुमचे फळ असेल. शिष्यत्वाची तुमची जीवनशैली तुम्हांला शिष्य बनवणारे करील, आणि तुम्ही तुमच्यासारखे अधिक खरे शिष्य करणारे व्हाल. प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसाठी असलेले हे मंडळीचे जीवनचक्र आहे. महान आज्ञेमध्ये ख्रिस्ताचा हाच हेतू आहे.

आपल्या समाजात छोटीशी टक्केवारी असलेल्या ख्रिस्ती लोकांसमोर बहुसंख्य लोकांपर्यंत पोहोचण्याची म्हणजे त्यांना सुवार्ता सांगण्याची मोठी जबाबदारी आहे. सर्व जातीजमातीच्या आणि निरनिराळ्या भाषा बोलणाऱ्या सर्व लोकगटांना सार्वकालिक शिक्षेच्या धोक्यापासून ओढून काढून त्यांना ख्रिस्ताचे शिष्य बनवण्याची ही प्रचंड कामगिरी आहे. अर्थात, आपल्या देशाची एकंदर वस्तुस्थिती आपल्यासमोर तीन आव्हाने ठेवते :

(१) **लोकसंख्या** : ''जगाच्या इतर कोणत्याही भागापेक्षा भारतात अधिक आणि मोठे असे लोकगट आहेत की, ज्यांमध्ये एकही ख्रिस्ती व्यक्ती नाही, मंडळ्या नाहीत आणि सुवार्तासेवक नाहीत. सुवार्ताप्रसार न झालेल्या लोकांचे इतके मोठे प्रमाण जगातील दुसऱ्या कोणत्याही भागात नाही'' (ऑपरेशन वर्ल्ड, ७ वी आवृत्ती, २०१०, पृ.४०५–४१७). सध्या असलेल्या पूर्णवेळ सुवार्तिक आणि पाळकांकडून हे काम होऊ शकणार नाही.

**(२) लिंगभेद :** स्त्रियांचे आरोग्य आणि सुरक्षितता यांविषयीचे धोके घरात आणि घराबाहेर वाढत असल्यामुळे, त्यांच्या स्वातंत्र्यावर बरीच अडखळणे येत आहेत. आधुनिक जीवनशैलीची वाढ मोठ्या प्रमाणात झालेली असूनही अनेक स्त्रियांना आपण असाहाय्य आहोत, आपल्याला काही आशा नाही असे वाटते. त्या कायद्यासमोर रडतात, न्यायाची मागणी, विनंती करतात. आपल्याला मान्यता मिळावी, किंमत दिली जावी म्हणून त्या झगडतात. पण त्यांची प्राथमिक गरज ही आध्यात्मिक आणि सार्वकालिक स्वरूपाची आहे हे अर्थातच त्यांना समजत नाही. त्यांना त्यांचे खरे मोल मिळावे म्हणून त्यांच्यासाठी जो मेला आणि आता जिवंत आहे त्याचा प्रकाश त्यांना कोण दाखवणार?

**(३) ज्ञानाचा अभाव :** या दिवसांत देव सामर्थ्याने कार्य करत आहे, आणि अनेकजण ख्रिस्ताकडे येत आहेत. त्याचे शिष्य कसे व्हावे हे ज्यांना शिकवण्याची गरज आहे अशा स्त्रियांचे प्रमाण नवीन विश्वासणाऱ्यांमध्ये मोठे आहे. गंभीरपणे मूल्यमापन केले, तर त्या विश्वासात आणि देवाच्या चांगुलपणात वाढत असल्या तरी त्यांना देवाच्या वचनाच्या शिक्षणाचा अभाव आहे हे लक्षात येते. त्यामुळे त्यांच्या जीवनात विरोधकांकडून दबाव, छळ होतो तेव्हा त्यांच्यापैकी अनेकजणी आपला विश्वास सोडून देतात. त्याउलट, खरी शिष्या कसे व्हावे हे जर त्यांना शिकवले, तर मधमाशांच्या थव्याप्रमाणे देवाच्या राज्यासाठी सुसंघटितपणे कठोर मेहनत करण्याची आणि इतरांना ख्रिस्ताकडे आणण्याची चालना त्यांना मिळेल.

म्हणून, स्त्रियांमधून आपल्याला देवासाठी अधिक कामकऱ्यांची, ख्रिस्तासाठी साक्ष देणाऱ्या अधिकजणी, आणि शिष्य बनवणाऱ्या अनेकजणींची गरज आहे. स्त्रिया केवळ स्त्रियांनाच सुवार्ता सांगू शकतात असे नाही, तर त्या मुलांना, किशोरवयीन मुलामुलींना, आणि प्रौढ व्यक्तींनासुद्धा सुवार्ता सांगू शकतात म्हणून पुरुषांपेक्षा त्या चांगल्या सुवार्तिक होऊ शकतात हे मंडळीच्या अनेक पुढाऱ्यांच्या लक्षात आले आहे. शिष्य/शिष्या बनवणाऱ्या म्हणून स्त्रियांचा संभाव्य प्रभाव फार मोठा आहे.

या कार्याची निकड आपल्याला दोन गोष्टी करायला भाग पाडते. **पहिली** गोष्ट म्हणजे, आपण प्रार्थनापूर्वक आपल्या जीवनांचे मूल्यमापन करून ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्या म्हणून स्वतःला पुनःसमर्पित करणे (योहान.८:३१). **दुसरी** गोष्ट म्हणजे, ख्रिस्ताचे आवेशी साक्षीदार आणि शिष्य बनवणारे होण्यासाठी आपण स्वतःचे समर्पण केले पाहिजे. ही दोन्ही कार्ये साध्य करण्याच्या दृष्टीकोनातूनच विनची रचना करण्यात आली आहे.

विनमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व स्त्रियांना महान आज्ञेची पूर्तता करण्यामध्ये भूमिका पार पाडावी लागेल. देवाने तुम्हांला निवडले आहे! यापेक्षा मोठा विशेषाधिकार दुसरा नाही.

**सखोल शिष्यत्वासाठी आवाहन मिळालेल्या, तसेच इतरांना शिष्य बनवण्यासाठी, ज्या महिला सुसज्ज होतील, अशा महिलांसोबत गतीशील, आध्यात्मिक संघटनकार्य हाती घेण्यास कटिबद्ध असलेल्या ख्रिस्ती महिला पाहण्याचे स्वप्न ''विन'' पाहते! चला आपण ''विनर्स'' होऊ या!**

ज्याची कृपा ख्रिस्ती शिष्याच्या जीवनातील
सर्व चांगल्या कार्यांचा पाया आहे,
त्या देवाला सर्व गौरव असो.
ख्रिस्ताच्या कार्यासाठी आपले,

– विन द्रष्टे



# टिप्पणी

# २ शिष्याची गुणलक्षणे

**मुख्य वचन : कलस्सै.१:१०**

''''...तुम्ही सर्व प्रकारे प्रभूला संतोषवण्याकरता त्याला शोभेल असे वागावे, म्हणजे प्रत्येक प्रकारच्या सत्कार्याचे फळ द्यावे आणि देवाच्या पूर्ण ज्ञानाने तुमची वृद्धी व्हावी.''''

## प्रस्तावना

१. अनेकजण येशूवर विश्वास ठेवतात, पण जो येशूवर मनापासून प्रीती करतो आणि त्याचे अनुसरण करतो तो शिष्य आहे.

अ. लोकसमुदाय अन्न, चमत्कार, आरोग्य, सुटका आणि राजकीय स्वातंत्र्य यांसाठी येशूच्या मागे चालत होते. ते येशूचे शिष्य होते का? (योहान.६:१४–१५).

ब. बारा प्रेषितांनी येशूसोबत राहण्यासाठी आणि त्याचे अनुसरण करण्यासाठी आपल्या वैयक्तिक जीवनांचा त्याग केला. ते येशूचे शिष्य होते का? (मत्तय.४:१९–२०).

२. या पाठात आपण येशू ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्याची गुणलक्षणे शिकणार आहोत, तसेच आपण खरे शिष्य कसे व्हावे हे शिकणार आहोत.

## येशू ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्याची गुणलक्षणे

***१. खरी शिष्या इतर कशाहीपेक्षा देवावर अधिक प्रीती करते*** (लूक.१४:१६–२६)

अ. देवावरील प्रीती हे खऱ्या शिष्याच्या जीवनाचे प्रबळ गुणलक्षण आहे. येशू ख्रिस्तावरील आपल्या प्रीतीची दुसऱ्या कोणत्याही प्रीतीशी स्पर्धा नसावी.

येशूवरील आपली प्रीती ही स्वतःवरील प्रीतीपेक्षा अधिक असली पाहिजे. आपण आपल्या स्वतःच्या इच्छा, आपली स्वप्ने, आपले छंद आणि सवयी, आपली फुरसत आणि आपले आनंद यांपेक्षा त्याच्यावर अधिक प्रीती केली पाहिजे.

ब. येशूवर असलेल्या शिष्यांच्या प्रीतीची तुलना करता इतर सर्व प्रकारचे प्रेम हे द्वेषासारखे आहे.

- वास्तविक पाहता आपण आपल्या कुटुंबांचा द्वेष करू नये हे आपल्याला माहीत आहे. उदा. पेत्राने त्याच्यासोबत त्याच्या पत्नीलाही सेवाकार्यात आणले (१ करिंथ.९;५).

- आपल्या कुटुंबाची आणि आपल्या नातेवाइकांची आपण काळजी घेतली पाहिजे हे आपल्याला माहीत आहे. पवित्र शास्त्र म्हणते की, जे असे करत नाहीत ते ''विश्वास न ठेवणाऱ्या माणसापेक्षा वाईट आहेत'' (१ तीमथ्य.५:८).

- स्त्रियांनी सद्गुणी असावे, त्यांनी देवाचे भय बाळगावे आणि आपल्या घरादाराची चांगली काळजी घ्यावी असा सद्बोध नीती.३१:१०–३१ या वचनांमध्ये केला आहे. १ तीमथ्य.२:९–१० आणि १ पेत्र.३:१–६ हे शास्त्रभाग जुन्या करारातील या शास्त्रभागाची संक्षिप्त रूपे आहेत.

- लूक.१४:२६ या वचनातील द्वेष या शब्दाचा साधासरळ अर्थ म्हणजे कमी प्रीती करणे. आपण ख्रिस्तावर जितकी प्रीती करतो त्यापेक्षा कमी प्रीती आपल्या कुटुंबावर आणि नातेवाइकांवर करावी.

  - आपले कुटुंब आणि नातेवाईक यांच्यापेक्षा अधिक प्राधान्य आपण ख्रिस्त आणि त्याच्या कार्याला दिले पाहिजे.

  - त्याची सुवार्ता सांगण्यासाठी त्याने जर आपल्याला पाचारण केले असेल, तर त्यांना सोडून जाण्यास आपण तयार असले पाहिजे.

  - त्याने त्यांना आमच्यापासून दूर केले, तर काहीही कुरकुर न करता आपण त्याच्या अधीन झाले पाहिजे.

क. मत्तय.१०:३७ मध्ये येशूने अक्षरशः अतिशयोक्ती करून या सत्यावर जोर दिला

आहे. आपण सर्वांत जास्त प्रीती ख्रिस्तावर केली पाहिजे असा या वचनाचा अर्थ आपण समजून घेतला पाहिजे. जर आपण तसे करणार नाही, तर आपण त्याचे शिष्य होण्यास किंवा ख्रिस्ती होण्यास पात्र नाही.

ड. जी शिष्या आपल्या जीवनात येशूला प्रथम स्थान देते, तिला पारितोषिक मिळेल (मत्तय.६:३३; मार्क.१०:२८–३०).

***२. खरी शिष्या आपला वधस्तंभ उचलते*** (लूक.१४:१७; मार्क.८:३४–३५).

अ. प्रारंभीच्या मंडळीमध्ये वधस्तंभ हा मरणाचे किंवा मरणाची निवड करण्याचे प्रतीक होता. आताच्या मंडळीत तसे नाही. एखाद्या स्त्रीने जर येशूची शिष्या होण्याचा निर्धार केला असेल, तर तिने रोज आपला वधस्तंभ उचलला पाहिजे.

ब. हे पौलाप्रमाणे दृष्टीकोन बाळगण्यासारखे आहे : ‘‘कारण मला तर जगणे हे ख्रिस्त आणि मरणे हा लाभ आहे’’ (फिलिप्पै.१:२१). ख्रिस्त आणि त्याचे कार्य यांसाठी तिने आपला जीवदेखील द्यायला तयार असले पाहिजे.

क. देहाच्या इच्छाआकांक्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी तिने स्वतःचा नाकार केला पाहिजे. येशू ख्रिस्ताच्या अनुयायाने जगिक सुखाची किंवा भरभराटीची लालसा बाळगू नये, तर शिस्तबद्ध असावे. तिने स्वनाकार करावा आणि ख्रिस्तासाठी जगिक ऐषोआराम, सुखे इ. सर्वांचा त्याग करण्यास तयार असले पाहिजे.

ड. ख्रिस्ताच्या सेवाकार्यासाठी देव तिला जे काही ओझे देईल ते तिने आनंदाने आणि धैर्याने वाहिले पाहिजे, तसेच आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही सांभाळल्या पाहिजेत.

- हे करत असताना, देवाने दिलेली ओझी आणि आपल्या किंवा इतरांच्या पापी कृत्यामुळे (उदा. अपशब्द, छळ, दुरुपयोग) आपल्यावर लादली गेलेली ओझी यांच्यातील फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे.
- शिष्येच्या मानेवर येशू ख्रिस्ताचे जू असते (मत्तय.११:३०). एखादे ओझे वाहण्यासाठी खूप जड वाटत असेल, तर पापामुळे लादले गेलेले ओझे फेकून देण्यासाठी ख्रिस्ताकडून सुज्ञता आणि मदत मिळावी म्हणून तिने प्रार्थना केली पाहिजे, आणि जी ओझी वाहण्यासाठी तो तिला मदत करतो ती ओझी वाहण्यासाठी समर्थ झाले पाहिजे.

### ३. *खरी शिष्या ख्रिस्ताचे अनुसरण करते* (लूक.१४:२७)

अ. ख्रिस्ताचे अनुसरण करणे म्हणजे त्याच्या आज्ञा पाळणे. जो कोणी ख्रिस्तावर प्रीती करतो तो/ती त्याच्या शिकवणीनुसार आचरण करते म्हणजे त्याने दिलेल्या शिक्षणाचे पालन करते. आणि जो कोणी त्याच्या आज्ञा पाळतो/पाळते तो/ती त्याच्या प्रीतीत राहते (योहान.१४:२३; योहान.१५:१०).

ब. ख्रिस्ताचे अनुसरण करणे म्हणजे त्याच्या उदाहरणाचे अनुकरण करणे किंवा त्याच्या उदाहरणाची नक्कल करणे. खरी शिष्या ख्रिस्ताचे जीवन आणि शिकवण यांवर सतत मनन करते. त्याने घालून दिलेल्या कित्त्यानुसार स्वतःच्या जीवनात रोज सुधारणा करण्याची, स्वतःच्या चुकांची दुरुस्ती करण्याची सवय तिला असते (फिलिप्पै.२:४).

क. ख्रिस्ताचे अनुसरण करणे म्हणजे, त्याच्या उद्देशासाठी स्वतःला पूर्णपणे समर्पित करणे. म्हणजे ''मला तर जगणे हे ख्रिस्त... आहे'' (फिलिप्पै.१:२१) असे म्हणणाऱ्या पौलासारखे हे आहे.

ड. ख्रिस्ताला अनुसरणे म्हणजे मरेपर्यंत त्याच्याशी विश्वासू राहणे. शिष्या ही ''मी त्याला कधीही सोडणार नाही'' असा ठाम निश्चय करून ख्रिस्तावरील तिच्या विश्वासामध्ये दृढ राहते. जी केवळ सुरुवातच करते तिला नव्हे, तर जी अखेरपर्यंत टिकून राहते तिला पारितोषिक मिळते (फिलिप्पै.३:११-१४; प्रकटी.२:१०).

### ४. *खरी शिष्या आपली मालमत्ता सोडून द्यायला तयार असते* (लूक.१४:३३; मार्क.१०:२१).

अ. शिष्या या स्वतःच्या जीवाच्या किंवा जीवनाच्या मालक नसतात. त्या केवळ त्यांच्या (जीवाच्या) कारभारी असतात (१ करिंथ.६:१९).

ब. बेथानीच्या मरीयेने तिच्याजवळची सर्वांत मोलवान गोष्ट म्हणजे अतिशय महाग असलेले जटामांसीचे तेल येशूच्या पायांना लावून त्याचे अभ्यंजन (अभिषेक) केले (योहान.१२:३).

क. श्रीमंत तरुणामध्ये एका गोष्टीची उणीव होती : येशूपेक्षा स्वतःच्या धनावर त्याची अधिक प्रीती होती. त्यामुळे तो त्याला अनुसरू शकला नाही (मार्क.१०;२१-२२).

**५. *खऱ्या शिष्येला देवाचे वचन माहीत असते आणि ती त्यात वाढते*** (योहान.८:३१).

अ. येशूला अनुसरणाऱ्या पुष्कळजणांनी येशूवर प्रथम विश्वास ठेवला, पण नंतर ते त्याला सोडून गेले (योहान.६:६). येशूने जाहीर केले की जो त्याच्या वचनात टिकून राहतो तो त्याचा शिष्य आहे. ख्रिस्ताच्या वचनावर असलेला सततचा विश्वास आणि वाढते आज्ञापालन ही ख्रिस्तावरील आपल्या प्रीतीची खरी परीक्षा आहे.

ब. नूतन जन्मलेल्या बालकाला जशी दुधाची भूक लागते, तशी शिष्याला देवाच्या वचनाची भूक लागते (१ पेत्र.२:२).

क. विश्वासणाऱ्याने जगण्यासाठी – आध्यात्मिकरित्या वाढण्यासाठी आणि सैतानाचा पराभव करण्यास सक्षम होण्यासाठी देवाच्या वचनाचे सेवन केले पाहिजे. देवाच्या वचनाचे सेवन करण्याद्वारे आपण ख्रिस्ताचे सेवन करतो (मत्तय.४:४; योहान.६:३५).

ड. ख्रिस्ताची शिष्या आपले जू उचलते आणि त्याच्या आज्ञा कशा पाळाव्या व त्याच्या वचनात प्रकट झालेली त्याची इच्छा कशी पूर्ण करावी या दोन्ही गोष्टी त्याच्याकडून शिकते (मत्तय.११:२९–३०).

**६. *खरी शिष्या पवित्र जीवन जगून देवाला संतुष्ट करण्याचा प्रयत्न करते*** (१पेत्र.१:१५).

अ. देवाने ख्रिस्ताच्या अनुयायांना पवित्र जीवनासाठी पाचारण केले आहे (१ थेस्सल.४:७),

ब. आपल्या तारणाच्या वेळी आपल्याला ख्रिस्त येशूमध्ये पवित्र करण्यात आले आहे, आणि सततच्या पवित्रीकरणासाठी आपल्याला पाचारण करण्यात आले आहे (१ करिंथ.१:२).

क. आपल्या आजूबाजूच्या अविश्वासणाऱ्यांच्या जीवनशैलीपासून आपल्याला वेगळे करण्यात आले आहे, आणि देवासाठी व त्याच्या कार्यासाठी आपल्याला समर्पित करण्यात आले आहे, असा ''पवित्र'' या शब्दाचा अर्थ आहे. ज्या शिष्या नाहीत, त्यांच्यापेक्षा शिष्या वेगळी असलीच पाहिजे. ती जिवंत, पवित्र देवाला समर्पित असते.

ड. पवित्रता हा शिष्याच्या जीवनात असलेले देवाचे तारण आणि सान्निध्य यांचा पुरावा आहे (१ योहान.३:६–९).

**७. *खरी शिष्या इतर शिष्यांवर प्रीती करते*** (योहान.१३:३४–३५).

अ. बंधूप्रीती हे पहिल्या शतकातील ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांचे इतके लक्षवेधक गुणवैशिष्ट्य होते की, त्यांचे वर्णन करताना एका इतिहासकाराने म्हटले, ''एकमेकांची ओळख होण्यापूर्वीच ते एकमेकांवर प्रीती करतात.'' ते ख्रिस्ताचे अनुयायी आहेत याविषयीची त्यांची ती साक्ष आहे.

ब. शिष्य एकमेकांवर प्रीती करतात, कारण ख्रिस्तामध्ये आणि ख्रिस्ताद्वारे व्यक्त झालेली देवाची प्रीती त्यांनी ओळखली आहे.

क. येशू हा ख्रिस्त आहे असा विश्वास बाळगणारी प्रत्येक व्यक्ती देवाचे मूल बनते. आणि जे पित्यावर प्रीती करतात, ते सर्वजण त्याच्या मुलांवरही प्रीती करतात (१ योहान.५:१).

ड. ''प्रीती'' या शब्दासाठी ग्रीक भाषेत ''इरॉस, फिलिओ, अगापे'' असे तीन शब्द आहेत. योहानाच्या पहिल्या पत्रामध्ये वापरलेल्या ''अगापे'' शब्दाचा अर्थ ''निःस्वार्थी प्रीती असा होतो. शिष्यांनी देवाच्या निःस्वार्थी प्रीतीने एकमेकांवर प्रीती केली पाहिजे (१ योहान.३:१६–१८). त्यामुळे सुरक्षिततेची भावना निर्माण करणारी खरी सहभागिता निर्माण होते.

**८. *खरी शिष्या विपुल फळ देते*** (योहान.१५:५).

अ. देव हा द्राक्षमळ्याचा मालक/माळी आहे, येशू द्राक्षवेल आहे आणि शिष्य हे फांद्या आहेत. त्यांनी फळ दिले पाहिजे. जी फांदी फळ देणार नाही, ती तोडून जाळून टाकली जाईल. देवासाठी फळ देणे ही ख्रिस्ती सहभागितेची खरी परीक्षा किंवा चाचणी आहे (योहान.१५:१–२, ६).

ब. ''विपुल फळ देणे'' म्हणजे चांगल्या कार्यांमध्ये फलदायी असणे, मोठ्या प्रमाणात प्रभूचे कार्य करणे. आपला विश्वास, आपला पालट, आणि आपले सार्वकालिक तारण हे सत्कर्मांमुळे होत नाही, तर देवाच्या कृपेने मिळणारी ती मोफत देणगी आहे. पण, आपल्या नवीन जन्माद्वारे देवाने आपल्याला ख्रिस्त येशूमध्ये चांगली कर्मे करण्यासाठी निर्माण केले आहे. ही कर्मे त्याने

आपल्यासाठी अगोदरच तयार केली आहेत (इफिस.२:१०).

क. शिष्य पवित्र आत्म्याची फळे प्रकट करतो (गलती.५:२२-२५).

ड. शिष्य शिष्यरूपी फळ देतो - इतरांना ख्रिस्ताकडे आणतो आणि त्याने जे काही आज्ञापिले ते सर्व पाळण्यास त्यांना शिकवतो (मत्तय.२८:१८-२०).

## सारांश

१. येशू आपल्याला शिष्य होण्यासाठी आणि आपण इतरांना शिष्य करावे म्हणून पाचारण करतो. दुःखाची गोष्ट म्हणजे सर्वच ''ख्रिस्ती लोक'' शिष्य आहेत असे नाही.

२. शिष्या शिस्तबद्ध असते; याचा अर्थ असा की, प्रत्येक विश्वासणारी ही तिला वाटते किंवा हवे ते करत नाही, तर प्रभूला जे हवे ते करते.

३. आपल्याला मोल देऊन विकत घेण्यात आले आहे, आणि आपले जीवन आपले नाही, तर देवाचे आहे हे शिष्येला माहीत असते.

४. येशू हा शिष्येचा प्रभू आहे, म्हणजे तो तिच्या जीवनाचा एकमेव मालक आहे. आणि स्वामी आहे.

## चर्चेसाठी प्रश्न

१. खरा शिष्य इतर सर्व गोष्टींपेक्षा देवावर अधिक प्रीती करतो. जीवनातील कोणत्या गोष्टी शिष्याला देवापेक्षा अधिक प्रीती करण्यासाठी मोहित करू शकतात?

२. तुम्ही देवावर प्रीती करता हे दर्शवणाऱ्या कोणत्या गोष्टी तुम्ही इतरांसाठी करत आहात? तुम्ही इतर लोकांवर प्रीती करता हे व्यक्त करणाऱ्या कोणत्या गोष्टी करत आहात?

३. कोणाला तरी शिष्य करण्याच्या द्वारे तुम्ही खरोखर फळ देत आहात का? मागच्या महिन्यात तुम्ही कोणाला तरी साक्ष देऊन त्याला/तिला ख्रिस्ताकडे आणले आहे का? जर नसेल, तर का नाही?

**प्रार्थना**

*प्रिय पित्या, मी ख्रिस्ताची, माझ्या प्रभूची खरी शिष्या व्हावे म्हणून मला मदत कर, जेणेकरून मी त्याच्यावर सर्वांत जास्त प्रीती करीन आणि पूर्णपणे स्वतःचा नाकार करून मनापासून त्याला अनुसरीन. त्याच्यासाठी मी सर्वस्व, अगदी माझा जीवसुद्धा अर्पण करण्यास सदैव तयार राहावे, आणि तुझ्यासाठी विपुल फळ द्यावे म्हणून त्याच्या वचनात टिकून राहावे म्हणून मला साहाय्य कर. आमेन.*

## टिपा

# ३ बेथानीची मरीया एक चांगली शिष्या

**मुख्य वचन : योहान.१२:३**

*''तेव्हा मरीयेने अर्धा शेर शुद्ध जटामांसीचे मोलवान सुगंधी तेल घेऊन येशूच्या चरणांना लावले आणि आपल्या केसांनी त्याचे चरण पुसले; तेव्हा त्या सुगंधी तेलाच्या वासाने घर भरून गेले.''*

**बेथानीच्या मरीयेचा उल्लेख असणारे शास्त्रभाग :** लूक. ०:३८–४२; योहान.११:१–४५; योहान.१२:१–८.

**बेथानीच्या मरीयेच्या नावाचा उल्लेख न करता तिच्याविषयी सांगतात असे वाटणारे शास्त्रभाग :** मत्तय.२६:६–१३; मार्क.१४:३–९.

चांगली शिष्या कसे व्हावे याचे मरीयेने आपल्याला दाखवलेले सात मार्ग :

**१. मरीयेची येशूबरोबर वैयक्तिक मैत्री होती.**

अ. मरीया, तिची बहीण मार्था आणि त्यांचा भाऊ लाजर यांनी आपल्या घरात येशूचे स्वागत केले (लूक.१०:३८–३९).

ब. मरीयेचा येशूवर विश्वास होता. येशू आपला खरा मित्र असून त्याला आपली मदत करायची इच्छा आहे असा मरीयेचा विश्वास होता. तिच्या भावाच्या मृत्यूच्या प्रसंगी येशूने त्यांना नक्कीच मदत केली असती याची तिला खात्री होती (योहान.११:३२).

क. येशूच्या ठायी महान – तिच्या भावाचा मृत्यू रोखण्याचेदेखील – सामर्थ्य आहे असा मरीयेचा विश्वास होता (योहान.११:३२). येशूला वैयक्तिकरित्या ओळखणे

ही शिष्य होण्याची पहिली अट आहे. आपण आपल्या पापांचा पश्चात्ताप करून आपल्या जीवनात येशूचे स्वागत करण्याची, त्याचा स्वीकार करण्याची गरज आहे. त्याच्यावर विश्वास ठेवणे ही दुसरी अट आहे.

**२. मरीयेने येशूच्या चरणाजवळ जागा घेतली**

अ. प्रभू जे काही शिकवत होता ते ऐकत मरीया त्याच्या चरणाजवळ बसली. शिष्या देवाच्या वचनाचा म्हणजे पवित्र शास्त्राचा अभ्यास करते आणि देव जे मार्गदर्शन करतो ते ऐकते (लूक.१०:३९).

ब. मरीयेच्या भावाच्या कबरेजवळ तिची (मरीयेची) आणि येशूची भेट झाली तेव्हा ती नम्रपणे येशूच्या पाया पडली. सर्व अधिकार देवाच्या हाती आहे हे तिला माहीत होते. तिने नम्रपणे देवाकडे मदतीची याचना केली. शिष्या आपल्या प्रत्येक गरजेसाठी येशूच्या पायाजवळ येते (योहान.११:३२).

क. मरीयेने येशूला अभिषेक केला आणि सुगंधी तेलाने माखलेले येशूचे पाय स्वतः च्या केसांनी पुसण्यासाठी खाली वाकली. शिष्य येशूची उपासना करतात (योहान.१२:३).

**३. मरीयेने रोजच्या जीवनात तिच्या विश्वासाचे आचरण केले.**

अ. मरीया ही जीवनात प्रत्येक दिवशी येशूसाठी जगणाऱ्या कुटुंबाची सदस्या होती. (लूक.१०:३८–४२).

ब. तिचे येशूची खरी शिष्या असणे हे तरी तिच्या कुटुंबाने तिच्यावर अन्यायकारक आरोप करणे थांबवू शकले नाही (लूक.१०:३८–४०)

क. मरीयेचे येशूची खरी शिष्या असणे हे तिचे जीवनातील त्रासअडचणींपासून रक्षण करू शकले नाही (लाजराची गोष्ट पाहा, योहान.११:१–४४).

ड. ती येशूची शिष्या होती, पण त्यामुळे लोकांच्या कठोर शिक्षेपासून तिचा बचाव झाला नाही (मत्तय.२६:८–९; मार्क.१४:४–५; योहान.१२:४–६). शिष्या स्वतःला नाकारते आणि तिच्या रोजच्या जीवनासाठी असलेली देवाची इच्छा त्याच्यावरील पूर्ण विश्वासाने स्वीकारते.

**४. मरीया तिच्या कृत्यांवरून ओळखली जात होती.**

अ. येशू तिला बोलावत होता हे तिने ऐकले तेव्हा ती लगेच तो जेथे होता तेथे गेली.

आपल्या जीवनासाठी येशूची काय इच्छा आहे हे जेव्हा शिष्येला समजते तेव्हा ती ताबडतोब त्याचे आज्ञापालन करते (योहान.११:२८–२९).

ब. मरीयेने तिच्याजवळची सर्वोत्कृष्ट गोष्ट, सर्वांत मोलवान, सर्वांत महाग बक्षीस येशूला दिले. येशूने आपल्यासाठी इतके काही केले आहे की, आपल्या सर्वोत्कृष्ट कृत्यांसाठी आणि प्रयत्नांसाठी तो पात्र आहे.

क. मरीयेने अतिशय मोलवान सुगंधी तेल विपुल प्रमाणात येशूला दिले. त्यामुळे येशूच्या सेवेसाठी स्वतःचे समर्पण करण्याच्या बाबतीत तिने उच्च पातळी गाठली. शिष्या स्वतःला देतात. प्रेमाने, भक्तीभावाने आणि येशूच्या सेवाकार्यासाठी ओतले जाणारे बहुमोल सुगंधी तेल आपण स्वतःच आहोत (योहान.१२:३).

ड. मरीयेने कुपी उघडली आणि तिच्यातील सर्व सुगंधी तेल येशूवर ओतले. मरीयेप्रमाणे, शिष्य आपली स्वतःची जीवने उघडतात आणि स्वतःला येशू ख्रिस्तासाठी देतात (मार्क.१४:३).

**५. मरीया तिच्या फलदायी जीवनासाठी ओळखली जात होती.**

अ. मरीयेच्या मित्रमैत्रिणी तिला भेटायला आल्या. तेथे त्यांची येशूशी भेट झाली. येशूने जे केले ते पाहून त्यांनी येशूवर विश्वास ठेवला. शिष्या आत्मे जिंकणारी असते (योहान.११:४५).

ब. मरीयेने येशूच्या अंगावर सुगंधी तेल ओतले तेव्हा संपूर्ण घरात सुगंध दरवळला (योहान.१२:३). शिष्याची जीवनशैली देवाच्या पवित्र आत्म्याची प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता आणि इंद्रियदमन ही मधुर फळे दाखवतात (गलती.५:२२–२३).

**६. येशूने मरीयेला दिलेल्या प्रतिसादावरून मरीया ओळखली जाते.**

अ. मरीयेची बहीण मार्था हिने मरीयेवर टीका केली तेव्हा येशूने मरीयेची बाजू घेतली (लूक.१०:४२).

ब. तिचा भाऊ लाजर मरण पावल्यावर येशूने बेथानीला भेट दिली, तेव्हा तिची भेट घेण्यासाठी त्याने तिला बोलावले (योहान.११:२८).

क. येशूने मरीयेचे दुःख पाहिले तेव्हा त्याला तिची दया आली. तो तिच्याबरोबर रडला (योहान.११:३३,३५).

ड. लाजराच्या मृत्यूमुळे मरीया आणि तिचे कुटुंब शोकग्रस्त झाले होते, तेव्हा येशूने त्याला (लाजराला) जिवंत करून त्यांचे सांत्वन केले (योहान.११:३८–४४).

इ. इतके महाग आणि मोलवान तेल येशूच्या अंगावर ओतल्यावर लोकांनी मरीयेवर टीका केल्यावर येशूने तिचा बचाव केला (योहान.१२:७–८).

फ. मरीया आणि मार्था यांनी येशूला आपल्या घरी येण्याचे आमंत्रण दिले, तेव्हा त्याने ते आनंदाने स्वीकारले (लूक.१०:३८–३९).

- आपण दिलेल्या देणग्यांचा येशू कृपाळूपणे स्वीकार करतो (योहान.१२:२).
- आपण दिलेली सेवाकार्याची भेट येशू स्वीकारतो, आणि त्याच्या सान्निध्याने आपले आभार मानून आपल्याला आशीर्वाद देतो (मार्क.१४:८; योहान.१२:२).
- आपल्या शिष्यांची सहभागिता मिळावी म्हणून येशू प्रयत्न करतो (योहान.११:२८).
- जे येशूवर प्रीती करतात त्यांच्यासोबत येशूला सहभागिता हवी आहे (लूक.१०:३८).

**७. मरीयेच्या जीवनात असलेल्या येशूच्या विश्वसनीयतेवरून ती ओळखली जात होती.**

अ. मरीयेच्या उपासनेच्या कृतीविषयी गैरसमज निर्माण झाला, आणि तिच्यावर कठोरपणे टीका करून तिला दोष देण्यात आला. काय घडत आहे ते पाहून येशूने तिचा बचाव केला (मार्क.१४:४–९).

ब. मरीयेचा सन्मान केला जाईल हे येशूचे शब्द खरे ठरले. पवित्र आत्म्याने मत्तय आणि मार्क या दोघांनाही तिची कथा आणि तिच्याविषयी येशूने केलेले भविष्य यांचा उल्लेख त्यांच्या शुभवर्तमानात करण्यास भाग पाडले. पवित्र शास्त्र वाचणाऱ्यांना मरीयेने केलेले कृत्य, आणि त्याला येशूने दिलेली मान्यता हे समजते (मत्तय.२६:१३; मार्क.१४:९). येशूद्वारे आम्हांला मिळणारी सुटका

किंवा आम्ही केलेल्या कार्याचे प्रतिफळ आम्हांला ताबडतोब मिळेलच असे नाही. कदाचित आम्ही स्वर्गात जाईपर्यंत ते मिळणार नाही. पण येशू त्याच्या शिष्यांना मदत करील, आणि त्यांचा सन्मान करील (मत्तय.१९:२९).

## चर्चेसाठी प्रश्न

१. मी येशूचा चांगला शिष्य होण्यासाठी माझ्या पापांचा पश्चात्ताप करण्याची आणि येशूसोबत वैयक्तिक नातेसंबंध ठेवण्याची का गरज आहे? त्याच्याशी मैत्री ठेवून रोज त्याच्यासोबत चालण्यामुळे मी कोणकोणत्या गोष्टी शिकू शकते?

२. मरीयेने रोज आपल्या विश्वासानुसार आचरण केले. माझ्या जीवनात अशा कोणत्या गोष्टी किंवा परिस्थिती आहेत, की ज्यांचे नियंत्रण मी पूर्णपणे येशूच्या स्वाधीन केल पाहिजे?

३. मी येशूची शिष्या आहे हे माझ्या आजूबाजूच्या लोकांना समजावे म्हणून मी निश्चित अशा कोणकोणत्या गोष्टी करू शकते?

## प्रार्थना

*स्वर्गीय पित्या, मरीयेने जशी सुवासिक आणि स्पर्श करता येण्याजोगी भेट/बक्षीस येशूला दिली, तशी देणगी त्याला देण्यासाठी माझा प्रिय प्रभू येशू प्रत्यक्ष उपस्थित नाही. येशूची शिष्या या नात्याने माझ्या जीवनात मी अधिक चांगल्या प्रकारे नम्रता आणि फलदायीपणा कसा दाखवावा हे मला शिकव. माझ्यामध्ये त्याची समक्षता परावर्तित झालेली माझ्या सभोवतालच्या लोकांना दिसावी म्हणून मी कसे जगावे हे मला शिकव.*



# टिप्पणी

# ४ शिष्याची जीवनशैली

**मुख्य वचन : योहान.१५:५**

''मीच वेल आहे, तुम्ही फाटे आहात...''

## प्रस्तावना

१. प्रत्येक झाड त्याच्या फळावरून ओळखले जाते. येशू ख्रिस्ताचा शिष्य जर खऱ्या द्राक्षवेलाची म्हणजे येशूची फांदी असेल, तर आपल्या वागण्याबोलण्यातून ते दिसलेच पाहिजे.

२. जगाच्या प्रथा आणि मूल्ये स्वीकारण्याचा मोह आपल्याला नेहमीच होतो. आपण जगासारखे किंवा जगातील इतर स्त्रियांसारखे दिसावे म्हणून महिला त्यांच्यासारखी वेशभूषा, केशभूषा, पादत्राणे आणि दागदागिने यांची नक्कल करण्याचा प्रयत्न करतात. त्यांच्यासारखे वागण्याबोलण्याचा मोह आपल्यालादेखील होऊ शकतो. पण आपण ज्या ख्रिस्ताच्या शिष्या आहोत, त्या आपली जीवनशैली देवाला संतोष देणारी असावी अशी त्याची आपल्याकडून अपेक्षा आहे.

३. आपल्या ख्रिस्ती चालचलणुकीत आपण देवाला संतोष देत आहोत की नाही हे प्रकट करणारे प्रश्न स्वतःला विचारून स्वतःचे परीक्षण करण्यासाठी नियमितपणे वेळ काढणे ही चांगली प्रथा आहे. ख्रिस्ती शिष्येच्या जीवनशैलीचे व्यवस्थित आकलन पुढील चार मुद्दयांच्या आधारे करता येईल.

## १. शिष्या आणि तिचे तारण

१. पवित्र शास्त्र म्हणते, ''...भीत व कापत आपले तारण साधून घ्या; कारण इच्छा करणे व कृती करणे हे तुमच्या ठायी आपल्या सत्संकल्पासाठी साधून देणारा तो देव आहे'' (फिलिप्पै.२:१२-१३). **म्हणून,**

अ. **केवळ देवावरच विश्वास ठेवणे.** तारणसाठी आपण केवळ देवावरच विश्वास ठेवला पाहिजे. तारण होण्यासाठी आरोग्यदान, बाप्तिस्मा, मानवी कार्ये किंवा मानवी प्रयत्न यावर आपण अजिबात विश्वास ठेवू नये (प्रे.कृ.४:१२; इफिस.२:८–९).

ब. **ख्रिस्ताला तुमच्या जीवनाचा प्रभू करणे.** ख्रिस्त हा खऱ्या अर्थाने आपल्या जीवनाचा स्वामी, प्रभू असला पाहिजे. आपली इच्छा पूर्णपणे देवाच्या अधीन केली पाहिजे (लूक.९:२३; लूक.१४:२६).

२. आपल्या रोजच्या वागण्याबोलण्यातून आपले तारण दिसले पाहिजे. **म्हणून,**

अ. **तुमच्या वेळेचा उपयोग सुज्ञतेने करा.** आपण आपल्या वेळेचा उपयोग कसा करतो आणि आपले प्राधान्यक्रम कसे निश्चित करतो यावरून ख्रिस्तावरील आपली निष्ठा, आपली समर्पितता दिसली पाहिजे (इफिस.५:१५–१६). जगिक सुखे मिळवण्याची खटपट आपण करू नये, तर देवाची इच्छा पूर्ण करण्यासाठी आपल्या वेळेचा उपयोग केला पाहिजे (मत्तय.६:३३).

ब. **पवित्र होणे/असणे.** आम्ही पवित्र व्हावे किंवा असावे हा मापदंड देवाने आमच्यासाठी निश्चित केला आहे (१ पेत्र.१:१५–१७).

- पवित्र आत्मा आमच्या जीवनातून ओसंडून वाहून इतरांच्या जीवनांना स्पर्श करेपर्यंत आपण पवित्र आत्म्याने भरले पाहिजे (प्रे.कृ.१३:५२).
- आपण रोज पवित्र आत्म्याने परिपूर्ण झाले पाहिजे आणि त्याचे नियंत्रण आपल्यावर रोज असले पाहिजे (इफिस.५:१८).
- आपल्या सर्व वागणुकीत, आणि आपण जे काही करू त्या सर्वांमध्ये आपण पवित्र असले पाहिजे (१ पेत्र.१:१३).
- आपल्याकडून देहाची वासना पूर्ण केली जाऊ नये म्हणून आपण पवित्र आत्म्यामध्ये चालले पाहिजे (गलती.५:१६–२६).

क. **आपली चित्तवृत्ती ख्रिस्ताप्रमाणे असावी.** आपले मन ख्रिस्ताच्या मनासारखे असले पाहिजे (फिलिप्पै.२:५).

- शुद्ध विचारांनी आपण त्याला संतुष्ट करावे (फिलिप्पै.४:८–९).
- आपण पापाचा द्वेष कराव (स्तोत्र.११९:१०४).
- आपण देवाविरुद्ध किंवा इतरांविरुद्ध वागलो नाही हे जाणून आपण शुद्ध विवेकभावाने जगावे (प्रे.कृ.२४:१६).

- संकटाच्या प्रसंगीदेखील आपल्याठायी धीर आणि आनंद असला पाहिजे (याकोब.१:२–३, १२).

## २. शिष्या आणि तिचा प्रभू

१. देवासोबत आपली घनिष्ट सहभागिता असण्यासाठी आपण प्रार्थनेत वेळ घालवला पाहिजे. **म्हणून,**

अ. **प्रार्थनाशील स्त्री व्हा.** शिष्यांनी रोज कळकळीच्या प्रार्थनेच्या योगे देवाशी सहभागिता ठेवण्याची गरज आहे (याकोब.५:१६).

ब. **निरंतर प्रार्थना करा.** आपली अंतःकरणे सतत देवाच्या संपर्कात असली पाहिजेत (१ थेस्सल.५:१७).

क. **शुद्ध अंतःकरणाने प्रार्थना करा.** आपली प्रार्थना प्रामाणिकपणाची असली पाहिजे (मत्तय.६:५–७).

ड. **उद्देश बाळगून प्रार्थना करा.** आपण सर्वांसाठी,विशेषतः सर्वांचे तारण व्हावे म्हणून प्रार्थना केली पाहिजे (१ तीमथ्य.२:१–४).

२. देवाच्या वचनाचे म्हणजे पवित्र शास्त्राचे मननचिंतन करण्याच्या योगे शिष्यांनी देवासोबतसहभागिता ठेवण्याची आवश्यकता आहे. **म्हणून,**

अ. **देवाचे वचन वाचा** (प्रकटी.१:३). देवाचे वचन हे आपल्याला जगण्यासाठी आवश्यकअसलेले अन्न आहे (लूक.४:४).

ब. **देवाच्या वचनाचा अभ्यास करा** (२ तीमथ्य.२:१५). यामुळे देवाचे वचन इतरांना शिकवण्यासाठीदेखील आपण सक्षम होऊ (२ तीमथ्य.२:२).

क. **देवाच्या वचनाचे मनन करा** (स्तोत्र.१:२) देवाचे वचन वाचण्यामध्ये आणि त्यावर मनन करण्यामध्ये आपण वेळ घालवतो तेव्हा देव आपला विश्वास वाढवतो.

ड. **देवाचे वचन पाठ करा** (स्तोत्र.११९:११). देवाचे वचन आपल्या अंतःकरणात लपवून ठेवण्यामुळे पापापासून आपले रक्षण होते.

इ. **देवाचे वचन उद्धृत करा** (मत्तय.४:१–११). देवाच्या वचनाचे सामर्थ्य आणि

अधिकार यांवर – विशेषतः आपल्यावर मोह किंवा संकटे येतात तेव्हा – आपण विश्वास ठेवतो हे ठासून सांगण्यासाठी आपण देवाच्या वचनाचे उद्धरण देण्याच्या ख्रिस्ताच्या उदाहरणाचे (जेव्हा त्याने म्हटले, ''असे लिहिले आहे'') अनुसरण केले पाहिजे.

**फ. देवाच्या वचनाचे पालन करा** (याकोब.१:२२). सर्व शास्त्रलेख देवाने प्रेरित केले आहेत आणि त्यांच्या लेखकाप्रमाणेच ते परिपूर्ण आहेत, तसेच जे त्यावर विश्वास ठेवून त्याचे पालन करतात त्यांना परिपूर्ण करण्यासाठी ते योग्य आहेत.

## ३. शिष्या आणि इतर लोक

१. शिष्यांनी सर्व लोकांवर देवाची प्रीती दाखवण्याची गरज आहे (मार्क.१२:२९–३१). **म्हणून,**

अ. **तुमच्या विश्वासणाऱ्या सोबत्यांवर प्रीती करा.** ख्रिस्ताने जशी तुमच्यावर प्रीती केली,तशी तुम्ही एकमेकांवर प्रीती करा. तुम्ही खऱ्या शिष्या आहात हे यावरून लोकांना कळेल (योहान.१३:३४–३५).

ब. **तुमच्या शेजाऱ्यांवर प्रीती करा.** आपण आपल्या शेजाऱ्यांशी दयाळूपणे वागतो तेव्हा त्यांची उभारणी होते, आणि या जगातील इतर लोकांसारखे आपण नाही हे त्यांच्या लक्षात येते (रोम.१५:२).

क. **अनोळखी लोकांनाही देवाची दाखवा.** ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी अनोळखी लोकांवरदेखील प्रीती केली पाहिजे, कारण ख्रिस्ताने आपल्याला स्वीकारले आहे, याच्या ओसंडून वाहणाऱ्या आनंदात आपण इतरांना सहभागी करतो (अनुवाद १०:१९).

ड. **तुमच्या शत्रूंनासुद्धा देवाची प्रीती दर्शवा.** ख्रिस्ती लोकांनी, जे त्यांचा छळ करतात त्यांनासुद्धा क्षमा करून त्यांच्यावर प्रीती केली पाहिजे (लूक.६:२७–३१; मत्तय.५:४४; रोम.१२:१९–२१).

२. शिष्यांनी इतर विश्वासणाऱ्यांसोबत सहभागिता ठेवली पाहिजे (इब्री.१०:२५). **म्हणून,**

अ. **नियमितपणे चर्चला जाणे.** पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, आपण एकमेकांना भेटणे सोडू नये (इब्री.१०:२४–२५).

ब. **तुमच्या संगोपन गटात नियमितपणे जा.** महिलांची उन्नती व्हावी म्हणून इतर त्यांना एकत्र करणे, त्यांच्याशी संबंध प्रस्थापित करणे ही विनच्या सेवाकार्याचा एक भाग आहे (तीत.२:३–५).

क. इतर ख्रिस्ती लोकांना तुमच्या घरी सहभागितेसाठी बोलावून त्यांचे **आदरातिथ्य करा** (१ पेत्र.४:८–९).

३. शिष्यांनी एकमेकांसोबतच्या नातेसंबंधामध्ये ख्रिस्तासारखी चित्तवृत्ती दाखवली पाहिजे. **म्हणून,**

अ. **जिच्यासोबत आनंदाने राहता येईल अशी मनमिळाऊ व्यक्ती व्हा.** आपण आनंदी लोक असले पाहिजे (फिलिप्पै.४:४–५). यामुळे आपल्या घरांमध्ये शांती आणि आनंद आला पाहिजे, कारण आपल्या कुटुंबातील इतर लोकांना आमच्यासोबत राहणे सोपे वाटते (इफिस.४:३–३२).

ब. **क्षमाशील व्हा.** ज्यांनी आपली आगळीक केली, जे आपल्याविरुद्ध वागले, त्यांना आपण खुल्या मनाने क्षमा केली पाहिजे (लूक.१७:३–४; मत्तय.६:१४–१५).

क. **कुठल्याही गोष्टीविषयी कडवटपणा बाळगणे टाळा.** कडवटपणा म्हणजे आपल्याविरुद्ध झालेल्या सर्व गोष्टींचाच विचार करणे (याकोब.३:१४–१८; इब्री.१२:१५).

ड. **सेवकाची वृत्ती अंगी बाणवणे.** आपण ख्रिस्ताप्रमाणे नम्र सेवक होऊन एकमेकांची सेवा करण्याद्वारे येशूची प्रीती व्यक्त केली पाहिजे (मत्तय.२०२६–२८; फिलिप्पै.२:५–८).

## ४. शिष्य आणि शिष्य बनवणे

१. शिष्यांनी नेहमी इतरांना सुवार्ता सांगून त्यांना तारणाचा स्वीकार करण्याची संधी दिली पाहिजे. **म्हणून,**

अ. **साक्ष देणारी ख्रिस्ती व्यक्ती व्हा.** तारणाविषयीची आपली साक्ष इतरांना सांगितली पाहिजे, आणि आपल्या वागणुकीने त्या साक्षीला पुष्टी मिळाली पाहिजे (मत्तय.५:१६).

ब. **तुमच्या विश्वासाविषयी इतरांना सांगण्याच्या संधी शोधा.** तुम्ही कोठेही असला,किंवा काहीही करत असला तरी तुमच्या विश्वासाविषयी इतरांना

सांगण्याच्या संधी तुम्ही नेहमी शोधत राहिले पाहिजे (प्रे.कृ.१:८).

२. शिष्यांनी इतरांना शिष्य बनवून सतत स्वतःच्या प्रतिकृती निर्माण केल्या पाहिजेत. **म्हणून,**

अ. **म्हणून मोहक शिष्य बनवणारे व्हा.** आपण आपली जीवने अशी जगली पाहिजेत की, ती पाहून इतरांनी आपले अनुकरण करावे (१ करिंथ.११:१).

ब. **शिष्य करा ही येशूची आज्ञा पाळा.** महान आज्ञेची पूर्तता करणे हे आपले सर्वोच्च पाचारण आहे (मत्तय.२८:८–२०).

३. चांगल्या शिष्य बनवणाऱ्या होण्यासाठी आपण सूचना, मार्गदर्शन, सद्‌बोध स्वीकारण्यास तयार असणाऱ्या, तसेच ज्यांना शिकवता येईल अशा असले पाहिजे (नीती.१८:१५). म्हणून

अ. **ज्यांना शिकवता येईल अशा व्हा.** सुधारणूक आणि शिक्षण यांमुळे ख्रिस्ताची मंडळी सुदृढ होते आणि दैवी कानउघाडणी ही आपल्यावर होणारी दया आहे, जिचा आपण स्वीकार केला पाहिजे (स्तोत्र.१४१:५).

ब. **इतरांमध्ये सौम्यतेने सुधारणूक घडवा** (सौम्यतेने सद्‌बोध करा). सद्‌बोध कठोरपणे करू नये, तर सौम्यतेने आणि ऐकणाऱ्याची उन्नती करणारा असावा (गलती.६:१).

क. **नम्रतेने सद्‌बोध स्वीकारा.** सद्‌बोधामुळे जर राग येत असेल तर अशा शिष्याने आपल्यामध्ये गर्वाचे पाप आहे की नाही हे पाहण्यासाठी स्वतःचे परीक्षण करावे (नीती.८:१३).

४. चांगले शिष्य हे सखोल ख्रिस्ती जीवनात उत्तरोत्तर वाढण्यासाठी आणि विकास होण्यासाठी प्रीतीच्या बंधनाने एकमेकांशी जोडलेले असतात. **म्हणून,**

अ. **मोठे व्हा (प्रौढ व्हा).** ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी केवळ दूध पिणारे बालक न राहता प्रौढ व्हावे म्हणून त्यांना पाचारण करण्यात आले आहे (इब्री.५:१२–१४).

ब. **वाढीला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतःला शिस्त लावा.** अभ्यास, शिक्षण आणि सहभागितेसाठी शिष्य स्वतःला समर्पित करतात तेव्हा ही वाढ होते (प्रे.कृ.२:४२).

क. **संगोपनसमूहामध्ये सक्रीय व्हा.** प्रत्येक शिष्याची यथायोग्य वाढ होण्यासाठी नियमितपणे संगोपन होणे (मार्गदर्शन मिळणे) आवश्यक आहे (१ पेत्र.५:१–५). प्रार्थना पवित्र शास्त्राभ्यास, सेवा, सुवार्ताप्रसार किंवा मिशनकार्य यांमध्ये सहभागी होण्याद्वारे ख्रिस्ती व्यक्तीला जबाबदारी किंवा उत्तरदायी होण्यास मदत मिळेल.

ड. **अविरत शिष्यत्वासाठी तुमचे जीवन समर्पित करा.** येशूने प्रार्थना केली की, मंडळीने त्याच्यासोबत आणि पित्यासोबत एक व्हावे. समर्पित शिष्यत्वाद्वारे ख्रिस्तामध्ये प्रौढ होण्यासाठी आपण एकत्रितरित्या कार्य करतो तेव्हा आपण एक होतो (योहान.१७:२१).

## सारांश

पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, मनुष्य बाहरूप पाहतो, पण देव अंतःकरण पाहतो (१ शमुवेल १६:७). आम्ही खरोखर कोण आहोत हे तो पाहतो. आपण उंच आहोत की बुटके आहोत, काळे आहोत की गोरे आहोत, सुंदर आहोत की सामान्य आहोत हे देवाच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही. देवाच्या दृष्टीने आमचे अंतःकरणाची स्थिती महत्त्वाची आहे. आपण प्रार्थनापूर्वक आपल्या अंतःकरणाचे परीक्षण करतो आणि देव आम्हांला कसे पाहतो आणि आम्ही त्याला संतोष देतो की नाही हे त्याने आम्हांला दाखवावे अशी त्याला विनंती करतो तेव्हा आल्या अंतःकरणाची स्थिती आपल्याला समजते.

## प्रार्थना

*देवपित्या, मी तुझ्या वचनाचे आणि तुझ्या पवित्र आत्म्याचे आज्ञापालन करीत आहे की नाही याविषयी प्रार्थनापूर्वक स्वतःचे परीक्षण करीत असताना, मी तुला विनंती करतो की, माझ्या जीवनातील ज्या ज्या गोष्टींमध्ये मी वाढण्याची गरज आहे, त्या मला दाखव. माझी पापे मला दाखव. आणि मी पश्चात्ताप करत असताना हे प्रभू, सर्व अनीतीपासून मला शुद्ध कर. आमेन.*

# आध्यात्मिक वस्तूसूची

जेथे तुम्हांला एकटे बसता येईल अशी निवांत जागा शोधा. पवित्र शास्त्र उघडून पुढील शास्त्रभाग वाचा आणि त्यांसोबत दिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. ''☐ Y'' या चौकटीतील खुणेचा अर्थ ''होय'' असा आहे, आणि '' ☐N'' या चौकटीतील खुणेचा अर्थ ''नाही'' असा आहे.

☐ Y ☐ N १. माझ्या तारणासाठी मी केवळ ख्रिस्तावर भरवसा ठेवत आहे का? (योहान.३:१६; इफिस.२:८–९

☐ Y ☐ N २. ख्रिस्त माझा प्रभू आहे का? (लूक.९:२३; लूक.१४:२६).

☐ Y ☐ N ३. माझे प्राधान्यक्रम देवाला संतोष देतात का? मत्तय.६:३३).

☐ Y ☐ N ४. माझ्यावर पवित्र आत्म्याचे नियंत्रण आहे का? आणि मी पवित्र आत्म्यामध्ये चालते का? (गलती.५:१६–२६; इफिस. ५:१८).

☐ Y ☐ N ५. माझ्या विचारजीवनावर देव संतुष्ट आहे का? (फिलिप्पै.४:८–९).

☐ Y ☐ N ६. मी खरोखर पापाचा द्वेष करते का? (स्तोत्र.११९:१०४)

☐ Y ☐ N ७. माझा विवेकभाव शुद्ध आहे का? (प्रे.कृ.२४:१६)

☐ Y ☐ N ८. मी त्रास, संकटे आनंदाने आणि धीराने सहन करते का? याकोब.१:१२).

☐ Y ☐ N ९. माझ्या प्रार्थनाजीवनावर देव संतुष्ट आहे का?

(फिलिप्पै.४:६; १ तीमथ्य.२:१-४).

☐ Y ☐ N १०. मी देवाचे वचन पाठ करत आहे का? देवाच्या वचनाचा अभ्यास आणि आज्ञापालन करत आहे का? (२ तीमथ्य. २:२; २:१५; ३:१६)

☐ Y ☐ N ११. ख्रिस्ताने जशी माझ्यावर प्रीती केली, तशी प्रीती मी देवावर आणि माझ्या शेजाऱ्यांवर करते का? (लूक.१०:२७; योहान.१३:३४).

☐ Y ☐ N १२. ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांच्या सहभागितेमध्ये मी नियमितपणे जाते का? (इब्री.१०:२५).

☐ Y ☐ N १३. मी आनंदी व्यक्ती आहे का? म्हणजे माझ्याबरोबर राहणे इतरांना आनंददायक वाटते का? (इफिस.४:३१-३२).

☐ Y ☐ N १४. मनात कसलेही किल्मिष न बाळगता क्षमेचा स्वीकार करणारे आणि क्षमा करणारे अंतःकरण माझ्याठायी आहे का? (मत्तय.६:१४-१५).

☐ Y ☐ N १५. एखाद्या गोष्टीविषयी माझ्या मनात किल्मिष, कटुत्व आहे का? (इब्री.१२:१५).

☐ Y ☐ N १६. माझ्यामध्ये सेविकेची चित्तवृत्ती आहे का? (मत्तय.२०:२८)

☐ Y ☐ N १७. माझ्या जीवनात मी ख्रिस्ताची साक्ष देत आहे का? (प्रे.कृ.१:८).

☐ Y ☐ N १८. मी शिष्या बनवत आहे का? (मत्तय.२८:१८-२०)

☐ Y ☐ N १९. मला शिकवता येऊ शकते का? (नीती.१८:१५).

☐ Y ☐ N २०. शिष्यत्वासाठी कोणी मला नियमितपणे प्रशिक्षण देत आहे का किंवा माझे संगोपन करत आहे का? (१ पेत्र.५:१-५).

तुम्ही या प्रश्नांची उत्तरे देवाच्या वचनानुसार जर प्रामाणिकपणे देणार नाही, तर या वस्तूसूचीमुळे फार काही साध्य होणार नाही. हे शास्त्रभाग किंवा प्रश्न जर तुमच्या समर्पणातील काही कच्चे दुवे किंवा तुमच्या जीवनातील पापे दाखवत असतील, तर तुमच्या जीवनात ज्या ज्या गोष्टींमध्ये सुधारणा करण्याची गरज आहे त्या गोष्टी एका कागदावर लिहून काढा. तसेच जी पापे कबूल करून त्यांची क्षमा मिळवण्याची गरज आहे, ती पापे दुसऱ्या कागदावर लिहा. प्रार्थनेत वेळ घालवून ती पापे कबूल करा. त्यांचा पश्चात्ताप करा, आणि तुमचे जीवन पुन्हा ख्रिस्ताला समर्पित करा! मग १ योहान.५:९ हे वचन कागदावर लिहा, या पापांची तुम्हांला क्षमा मिळाली आहे, आणि त्यांच्यावर तुम्ही विजयी झाला आहात असा विश्वास बाळगा (दावा करा). सरतेशेवटी, देवाकडून तुम्हांला पापक्षमा मिळाली आहे याचे चिन्ह म्हणून हा कागद फाडून टाका. ज्या ज्या बाबतीत तुम्हांला सुधारणा करण्याची गरज आहे, त्या त्या बाबतींत धैर्याने पावले उचलण्यासाठी देवाने तुम्हांला सुज्ञता द्यावी म्हणून विनंती करा (याकोब.१:५). मग तुमच्या आजूबाजूच्या किंवा तुमच्या संपर्कातयेणाऱ्या लोकांना सुवार्ता सांगून त्यांना शिष्य करण्याच्या प्रत्येक संधीचा लाभ घ्या.

## टिपा

# ५

# ख्रिस्तामध्ये

## पवित्र जीवनाविषयी वस्तुपाठ

**मुख्य वचन : २ करिंथ.५:१७**

*''म्हणून जर कोणी ख्रिस्ताच्या ठायी असेल तर तो नवी उत्पत्ती आहे; जुने ते होऊन गेले; पाहा, ते नवे झाले आहे.''*

**पवित्र शास्त्रातील संदर्भ :** कलस्सै.२:९–१२; रोम.८:१–११

**आवश्यक साहित्य** : काचेचा १ मोठा कटोरा, १ लहान ग्लास, ग्लासात बसतील असे लहानमोठे दगड, आणि सुंदर गोट्या, थोडीशी वाळू आणि माती.

**रचना** : ग्लास बुडेल इतके पाणी मोठ्या कटोऱ्यात भरा.

पूर्ण होण्याची आवश्यकता; ख्रिस्ताशिवाय पवित्र जीवन जगण्याच्या प्रयत्ना–तील व्यर्थता (इफिस.५:१८)

१. आत्म्याने परिपर्ण होण्याविषयी मी ऐकले आणि वाचले आहे. मला तसे पूर्ण होण्याची इच्छा आहे. सकाळी मी प्रार्थना–मनन करते **(ग्लास पाण्याने भरेल इतका बुडवा),** पण दुपारपर्यंत मी आत्म्याने अर्धवटच भरलेला आहे असे वाटते **(ग्लास हालवून त्यातील काही पाणी बाहेर टाका).** जसजशा अडचणी आणि संकटे आली तसतशी मी अधिकच रिकामी होत गेले. **(ग्लासातून पाणी बाहेर ओतणे चालू ठेवा.)**

२. ख्रिस्तामध्ये असण्याविषयी इफिसकरांस पत्राच्या १ ल्या अध्यायात जे लिहिले ते मी वाचले. **(ग्लास मोठ्या कटोऱ्यातील पाण्यात बुडवा.)** आता ग्लासात पाणी भरते, आणि ग्लास पाण्यात आहे. **(कोणाला तरी बोलवा आणि**

**पाण्याला स्पर्शन करता ग्लासला स्पर्श करायला सांगा.)** आपण ख्रिस्तामध्ये असतो तेव्हा सैतान आपल्याला स्पर्श करू शकत नाही. **(त्या व्यक्तीला तो ग्लास कटोऱ्यातल्या पाण्यात बुडलेला असतानाच उलटा करायला सांगा.)** पूर्वी, ग्लास जेव्हा पाण्याच्या बाहेर होता, तेव्हा आपण तो हलवला तेव्हा तो रिकामा झाला, पण आता मात्र तो भरलेलाच राहतो!

ख्रिस्तामध्ये : पूर्णता, संरक्षण, ख्रिस्ताच्या जी–वनाचे गुणवैशिष्ट्य (गलती.२:२०).

३. **(ग्लास पाण्यातून बाहेर काढल्यावर दगडाचे मोठे खडे त्यात टाका डपरिवर्तन होण्यापूर्वीची पापे दर्शवण्यासाठी दगडाच्या मोठ्या खड्यांनी तो भरा. पाहा रोम.५:६–८.)** विचारा : ग्लास पूर्ण भरलेला आहे का? होय, तो पाण्याने भरला आहे, पण त्यात टाकलेल्या दगडांमुळे पाणी बाहेर सांडत आहे. काही लोक असे जगतात की, त्यांची पापे (खडक) त्यांना पवित्र आत्म्याने परिपूर्ण होण्यापासून रोखतात. **(ग्लासामध्ये काही लहान दगड टाका.)** काही पापे लहान, इतरांना माहीत नसलेली आणि दिसत नसलेली गुप्त पापे आहे (१ योहान.१:८,१०; लूक.११:२४–२६). **(ग्लासात काही सुंदर गोट्या टाका.)** काही पापे ''सुंदर, आकर्षक'' आहेत, ही पापे म्हणजे मला आनंद वाटणाऱ्या आणि ज्या सोडण्याची माझी इच्छा नाही अशा सवयी (१ करिंथ.९:१२). काही पापे ''अडखळवणारी पापे'' आहेत. ही पापे पैसा, वेळ किंवा करमणूक यांसारख्या चांगल्या गोष्टी असू शकतात. पण आपण जर त्यांच्यावर अधिक प्रीती केली, आणि त्यांचा अयोग्य प्रकारे उपयोग केला तर ती आपल्याला अडखळवतात (इब्री.१२:१–२). पवित्र आत्म्याची जागा घेणारे असे तुमच्या जीवनात काय आहे? तुम्ही कशाने भरले आहात, पापाने (**दगड)** की ख्रिस्ताने? पाणी काठोकाठ भरलेले असेल, पण अर्धाअधिक ग्लास तर दगडांनीच भरलेला असेल.

पाप पवित्र आत्म्याला दूर सारते; ग्लास तुडुंब भरून वाहतो, पण केवळ पाण्याने नव्हे (इब्री.१२:१)

४. **(ग्लासातील दगड काढून ग्लास पुन्हा पाण्याने भरा. त्यात चिमूटभर माती टाका. कोणाला तरी ते पाणी प्यायला सांगा.)** माती किंवा पाप लहान असले तरी ते संपूर्ण गोष्ट प्रदूषित करते. आपला स्वर्गातील पिता जसा परिपूर्ण आहे, तसे देव आपल्याला परिपूर्ण व्हायला सांगतो (मत्तय.५:४८).

याकोब.२:१०
१ योहान.१:९

५. **(ग्लास पाण्यात ठेवा, आणि त्यातील थोडे पाणी सांडण्याचा प्रयत्न करा.)** मी ग्लास पाण्यात ठेवून त्यातील काही सांडण्याचा प्रयत्न करते तेव्हा काय सांडते? अर्थातच पाणी. जर कोणी तुम्हांला राग आणला, तर तुम च्या तोंडातून काय बाहेर पडते – शाप की आशीर्वाद? ख्रिस्ताच्या मुखातून आशीर्वाद बाहेर पडतात. ''पित्या त्यांना क्षमा कर.'' माझा त्रस्त, अस्वस्थ झालेला पती, माझी व्रात्य, तापदायक मुले, भांडखोर दुकानदार, माझा उद्धट ड्रायव्हर यांच्याशी मी नेहमी अशीच वागते का? माझ्या अंतःकरणात पाप असेल, तर आंबट आंबेप्रमाणे विनेगारप्रमाणे कटुत्व बाहेर निघेल. जर मी ख्रिस्ताने भरलेली असेल, तर केवळ मधुर मधाप्रमाणे केवळ ख्रिस्तच बाहेर पडेल!

जे आत आहे ते बाहेर येते.
याकोब.३:९–१२

६. **(पाण्याने पूर्ण भरलेला ग्लास कोणासमो तरी धरा आणि तिला त्यावर हलकेच टपली मारायला सांगा. तिने तसे करताना थोडेफार पाणी तिच्या अंगावर सांडू द्या.)** संबंधात्मक संपर्काच्या सर्व परिस्थितींमध्ये, तुम्ही ज्या व्यक्तीच्या संर्पकामध्ये आहात ती व्यक्ती तुमच्या जीवनातील पवित्र आत्म्याने प्रभावित झाली पाहिजे. त्यांच्यामुळे जरी तुम्ही व्यथित किंवा क्षुब्ध होता, तरी तुमच्या सान्निध्यात आल्यावर ते आशीर्वादित आहोत असे त्यांना वाटले पाहिजे. तुम्ही इतरांवर काय सांडत आहात?

आपल्याला शासन होते, तेव्हा इतर लोक आशीर्वादित होतील
उत्पत्ती १२:१–३
कलस्सै.१:२७
रोम.१२:१–२

तुमचे जीवन एखाद्या बाटलीसारखे आहे अशी कल्पना करा; देवाच्या आत्म्याच्या महासागरात ते टाका, आणि त्याला ते घेऊन भरू द्या. तुमचे जीवन ख्रिस्ताला समर्पित करा. त्याला तुम्हांला भरू द्या, तुम्हांला वेढू द्या, तुम्हांला मिठी मारू द्या, आणि तुमच्यामध्ये वस्ती करू द्या (योहान.१७:१–२६).

## चर्चेसाठी प्रश्न

१. तुम्हांला मोहात पाडणारी ‘‘छोटी छोटी आकर्षक पातके’’ कोणती आहेत?

२. तुम्हाला कोणाचा धक्का लागला, तर तुमच्या जीवनातून ‘‘काय बाहेर पडते?’’

## प्रार्थना

*तुमची पातके तुमच्या स्वतःच्या शब्दांत कबूल करा, तुमच्या जीवनात कोणकोणते दगडगोटे आणि माती आहे हे तुम्हांला समजावे म्हणून ख्रिस्ताकडे मदतीची विनंती करा, ते काढून टाकण्यासाठी त्याने तुम्हांला मदत करावी म्हणून विनंती करा, आणि त्याच्या पूर्णत्वामध्ये स्वतःला समर्पित करा (कलस्सै.१:२७).*

## *टिपा*

# ६ शिष्या आणि तिचे नातेसंबंध

**मुख्य वचन : रोम.१२:१८**

''शक्य तर सर्व माणसांबरोबर तुमच्याकडून होईल तितके शांतीने राहा.''

## प्रस्तावना

**१. जरी हे समजून घेणे आपल्याला कठीण असले तरी देव हा त्रैक देव – तीन व्यक्ती : पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा – आहे आणि तरीही तो एकच देव आहे (अनु.६:४).**

२. त्रैक्यातील या तीन व्यक्तींचा एकमेकांशी सतत निरोगी नातेसंबंध आहे. तसेच ख्रिस्ताच्या शिष्यांनी इतरांसोबत निरोगी सहभागितेमध्ये राहिले पाहिजे.

## शिष्याने जोपासले पाहिजेत असे चार महत्त्वाचे नातेसंबंध

**१. शिष्या जर विवाहित असेल तर तिने पतीसोबतच्या नात्याला महत्त्व देऊन ते नातेसंबंध जोपासले पाहिजेत.**

अ. शिष्येच्या जीवनातील इतर सर्व गोष्टींप्रमाणेच तिचा विवाहदेखील देवाला गौरव आणि सन्मान देण्यासाठी आहे (१ करिंथ.१०:३१).

ब. स्त्रियांनी जसे प्रभूच्या अधीन तसे त्यांच्या पतीच्या अधीन राहावे असे पवित्र शास्त्र सांगते. ही अधीनता देवाच्या आज्ञेचे पालन करीत, पतीचा आदर करणारी, आणि त्याच्या अधिकाराच्या अधीन होणारी आनंददायी आणि प्रेमाची अशी आहे (इफिस.५:२२,२५).

*ही मॅरीड अ प्रिन्सेस*

मधील अवतरणे

लेखिका : थेल्मा ब्राऊन

- जो पुरुष आणि स्त्री जीवनातील कोणत्याही गोष्टीपेक्षा – एकमेकांवरील प्रीतीपेक्षाही – देवावर अधिक प्रीती करतात, आणि त्याच्या वचनाचा
- एकत्र अभ्यास व प्रार्थना करतात त्यांना शत्रूला (सैतानाला) प्रतिकार करण्याचे मोठे सामर्थ्य मिळेल.
- जर तुमची चित्तवृत्ती आनंदी असेल, तर तुमचे घरदेखील आनंददायक ठिकाण होईल.
- तुमच्या पतीची प्रशंसा करण्याचा सराव करा. उपरोधाने बोलणे, निंदा करणे हा वैवाहिक संवादामधील कॅन्सर आहे.
- एकमेकांना खाली खेचण्याची, एकमेकांचा अपमान करण्याची सवय कधीही लागू देऊ नका. एकमेकांना उचलून धरण्यासाठी तुम्हांला शक्य असेल ते सर्व करा.
- तुमच्या पतीला उचलून धरा. त्याच्यावर प्रीती करा. त्याला देवाच्या अधिकाधिक जवळ आणा, कारण जोपर्यंत तो पूर्णपणे देवाचा होत नाही, तोपर्यंत तो कधीही पूर्णपणे तुमचा होऊ शकणार नाही!
- एकमेकांवर प्रीती करा अशी ख्रिस्ताने आपल्याला आज्ञा दिली, तेव्हा त्याने इतर नातेकाइकांना (इन–लॉज) त्यातून वगळले का?
- जे कुटुंब देवासोबत आणि देवासाठी जगते, ते कुटुंब जसजशी वर्षे उलटतात, तसतसे अधिक संपन्न आणि सुखी होत जाते. देवामध्ये राहणे ही याची गुरुकिल्ली आहे. वैवाहिक जीवनामध्ये जर देव असेल, तर विवाहापेक्षा मजबूत असे दुसरे काहीही असू शकत नाही, आणि तो जर नसेल, तर तो विवाह जेवढा तकलादू, भंगूर असेल तसे दुसरे काही नसेल. कुठल्याही दांपत्याला द्यावयाच्या सल्ल्याचा परमोच्चबिंदू हाच आहे की, ''देवाच्या निकट राहा.''

क. शिष्येची वर्तणूक अशी असावी की, ख्रिस्तासारख्या असणाऱ्या तिच्या चारित्र्याचा मोठा प्रभाव तिच्या अविश्वासणाऱ्या पतीवर पडेल. आत्म्याच्या फळांमध्ये मुरलेलेल्या तिच्या पवित्र, नम्रतायुक्त, देवभीरू आणि प्रेमळ संभाषणामुळे तिच्या पतीचा केवळ तिच्यावरच नव्हे, तर तिच्या प्रभूवरही विश्वास बसेल. ''ह्यासाठी की, कोणी वचनाला अमान्य असले, तरी तुमचे भीडस्तपणाचे निर्मल वर्तन पाहून ते वचनावाचून आपल्या स्त्रियांच्या वर्तनाने मिळवून घेतले जावे'' (१ पेत्र.३:१).

ड. पत्नीच्या भूमिकेसाठी देवाने ''पतीसाठी अनुरूप सहाय्यक'' (उत्पत्ती २:१८) हा जो हेतू निश्चित केला आहे, त्यामध्ये शिष्येला आपला स्वतःचा सन्मान आढळू शकेल. चांगली पत्नी तिच्या नवऱ्यावर प्रेम करते (तीत.२:४) आणि ''आमरण त्याचे हित करते, अहित नाही'' (नीती.३१:१२).

इ. ख्रिस्ती विवाह ही शिष्यांसाठी देवाची कृपा आणि प्रीती यांनी आपल्या जीवनसाथीदाराची साथसंगत करण्याची संधी आहे. पती आणि पत्नी दोघेही जर विश्वासणारे असतील, तर ते ''जीवनरूपी कृपादानाचे समाईक वतनदार'' आहेत (१ पेत्र.३:७). ते केवळ जगातील चांगल्या गोष्टींसाठी एकमेकांचे साथीदार नाहीत, तर सार्वकालिक जीवनासासाठीसुद्धा आहेत. कसलाही मतभेद किंवा असंतोष टाळून किंवा क्षमाशीलतेद्वारे त्या समस्या सोडवून, ते आध्यात्मिक ऐक्यामध्ये त्यांचे नातेसंबंध टिकवतात. विनाव्यत्यय प्रार्थनाजीवनासाठी हे आवश्यक आहे (मार्क.११:२५).

फ. इतर महत्त्वाच्या गोष्टींप्रमाणेच, आपल्या पती/पत्नीसोबत आपण वेळ घालवणे महत्त्वाचे आहे. या वेळात आपल्यामध्ये अर्थपूर्ण सुसंवाद असला पाहिजे. प्रीतीचा, ऐक्याचा हे मजबूत बंधनच मोहाविरुद्धचे संरक्षक कवच आहे (१ करिंथ.७:३–५).

ग. ''कुटंबांची स्थापना देवाने केली : ही त्याची संकल्पना आहे आणि त्याला ती प्रिय आहे. वैवाहिक संबंध हे ख्रिस्ताची मंडळीवर असलेली प्रीती दाखवण्यासाठीचा वस्तुपाठ आहे हे इफिस.५:२२–२३ ही वचने आपल्याला दाखवतात. विवाहसंस्था पवित्र, सुंदर संस्था असावी, त्याच्या वधूवर असलेल्या त्याच्या शुद्ध आणि परिपूर्ण प्रीतीचे संपूर्ण जगाला दिसणारे ते तेजस्वी चित्र असावे अशी

त्याची इच्छा आहे'' – ममा थेल्मा ब्राऊन.

**२. शिष्येने तिच्या मुलांसोबतच्या नात्याची कदर करून ते नातेसंबंध टिकवले पाहिजेत.**

अ. पालकांनी ''काय करावे'' आणि ''काय करू नये'' हे इफिस.६:४ मध्ये सांगितले आहे : तुमच्या मुलांना चिडीस आणू नका. प्रभूच्या शिस्तीत व शिक्षणात त्यांना वाढवा.

ब. आपल्या मुलांवर उगाचच टीका करून, त्यांच्याशी अनावश्यक कडक शिस्तीने वागून, लहानसहान गोष्टींवरून त्यांच्यावर रागावून, कोणातरी एकावरच अधिक प्रीती करून म्हणजे पक्षपातीपणे वागून, किंवा स्वतःच्या वागण्याबोलण्यात सातत्य न ठेवून आईबाप आपल्या मुलांना चिडीस आणू शकतात.



क. आपल्या मुलांसोबतच्या संबंधामध्ये (तसेच इतरांसोबतच्या संबंधामध्ये) आईबापांनी देवाचे स्वभावगुण दाखवले पाहिजेत. आपला स्वर्गातील पिता जसा उपकारी व कनवाळू आहे, तसे आपणही असले पाहिजे (इफिस. ४:३२).

ड. देवपिता जशी आपल्याला – आपण जे त्याचे शिष्य – शिस्त लावतो, तसेच गरज असेल तेव्हा आपण आपल्या मुलांना प्रेमाने शिस्त लावली पाहिजे (इब्री.१२:६).

इ. नीती.२२:६ सांगते की, ''मुलाच्या स्थितीस अनुरूप असे शिक्षण त्याला दे...'' ''शिक्षण'' यासाठी वापरलेल्या शब्दामध्ये सुधारणूक करणे आणि शिस्त लावणे

यांसह शिक्षण देणे याचा समावेश आहे.

फ. आपल्या मुलांना आपण पाप करण्यापासून रोखले पाहिजे. (रोखणे, आवर घालणे, पायबंद घालणे यासाठी वापरलेल्या मूळ शब्दाचे मार्गदर्शन करणे, सुधारणा करणे, मुकाबला करणे असे अर्थ आहेत). १ शमुवेल २:३४–३५ मध्ये आपण वाचतो की, एलीने त्याच्या मुलांना आवरले नाही, परिणामी देवाने त्यांच्या शत्रूंकडून त्यांचा नाश होऊ दिला.

ग. इतर कोणत्याही गोष्टींप्रमाणेच आपण आपल्या मुलांसोबत वेळ घालवणे महत्त्वाचे आहे. या वेळेत आपण त्यांच्यासोबत अर्थपूर्ण सुसंवाद केला पाहिजे (लूक.१:१७).

**३. शिष्येने कुटुंबातील इतर व्यक्तींसोबतचे नातेसंबंधांची कदर करून ते जपले पाहिजेत.**

अ. शिष्येचे सासूसासरे, नणंदभावजया, दीर इ. सर्व नातेवाईकांसोबत प्रेमाचे आणि आपुलकीचे संबंध असतात. रूथ ही याचे आदर्श उदाहरण आहे. कठीण परिस्थितीतसुद्धा तसेच तिच्यापासून मुक्त होण्याची, दूर जाण्याची संधी असतानाही रूथने तिच्या सासूवर प्रीती केली. तिने केवळ स्वतःच्याच भल्याचा विचार केला नाही, तर आपल्या सासूच्याही भल्याचा केला. तिचा जिवंत देवावर विश्वास होता आणि त्याचे तिला भय होते म्हणून ती असे करू शकली (रूथ.१:१६–१७; २:१४,१८).

ब. शिष्या आपल्या कुटुंबाची, आपल्या नोकरचाकरांचीसुद्धा चांगली काळजी घेते. आपल्या कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ती सकाळीच उठते आणि गरज असेल तर रात्री उशीरापर्यंत जागून काम करते. ती खूप कष्ट करते. ती आपल्या कुटुंबाच्या आचारविचाराकडेसुद्धा लक्ष देते (नीती.३१:१५–१७).

क. शिष्या तिच्यापेक्षा तरुण असणाऱ्या स्त्रियांसमोब चांगल्या गोष्टींचा आदर्श आणि मार्गदर्शक म्हणून नातेसंबंध जोपासते (तीत.२:३). त्यासाठी ती कुटाळखोर होणे टाळते, म्हणजे ती आपली जीभ आवरते (याकोब.३:५–६,८). तिचे स्वतःवर नियंत्रण असते, आणि सर्वांशी ती आदराने वागते.

ड. देवभीरूपणाचे चरित्रगुण विकसित व्हावे म्हणून शिष्या देवाच्या वचनातून शिकते (१ पेत्र.१:५–६). हे स्वभावगुण तिच्या सर्व नातेसंबंधांमध्ये दिसतात.

**४. शिष्येने तिच्या कुटुंबाबाहेरील व्यक्तींसोबतच्या संबंधांची कदर केली पाहिजे, तसेच काळजी/दक्षता घेतली पाहिजे.**

अ. अविश्वासणाऱ्यांसोबत तिने दक्षतेने वागले पाहिजे (कलस्सै.४:५). त्यांच्यामधील तिची वागणूक सभ्यतेची, प्रामाणिकपणाची असावी, जेणेकरून ख्रिस्तीत्वाला दोष देण्याचे कारण त्यांना मिळणार नाही. त्यामुळे त्यांना सुवार्ता सांगण्याच्या संधी तिला मिळतील.

ब. ती आदरातिथ्य करणारी असावी – इतरांच्या, विशेषतः जे ख्रिस्तासाठी कष्ट करत आहेत, आणि दुःखसहन करत आहेत, त्यांच्या गरजा पूर्ण करण्याची तिला सवय असावी (रोम.१२:१३).

क. ती गरीबांशी आणि गरजू लोकांशी, विशेषतः मंडळीतील सभासदांशी दयाळूपणे, दानशूरपणे वागणारी असावी (१ योहान.३:१७; याकोब.२:१५).

ड. देवाच्या मंडळीच्या अधिकाराचा तिने सन्मान करावा. तिच्या आध्यात्मिक कल्याणासाठी देवाच्या वचनातून विश्वासूपणे मार्गदर्शन करणारे सेवक जे शिक्षण देतात आणि इशारे देतात त्यांचे तिने पालन करावे (इब्री.१३:१७).

इ. ती बाहेर नोकरी करत असेल, तर तिने तिच्या वरिष्ठांचा आदर करावा आणि त्यांच्या आज्ञांचे पालन करावे. तिची कर्तव्ये तिने ती प्रभूची सेवा करत असल्याप्रमाणे विश्वासूपणे पार पाडावी (इफिस.६:५–८). ख्रिस्ती विश्वास आणि देवाचे वचन यांच्याशी सुसंगत असलेल्या गोष्टींचेच केवळ तिने पालन करावे.

**५. देवाच्या वचनात सांगितल्यानुसार शिष्येने इतरांसोबत शांतीने राहावे पुढच्या पानावरील ''एकमेकांविषयी'' या सदराखाली जे सांगितले आहे तेसुद्धा पाहावे.**

देवाला संतोष देणाऱ्या प्रकारे एकमेकांशी कसे वागावे याविषयी नवीन करारात जे सांगितले आहे त्यांपैकी काही गोष्टी किंवा मुद्दे पुढे दिले आहेत :

**एकमेकांवर प्रीती करा :**

१) १ योहान.४:७ – एकमेकांवर प्रीती करा.
२) १ पेत्र.४:८ – एकमेकांवर एकनिष्ठेने प्रीती करा.
३) १ पेत्र.१:२२ – एकमेकांवर मनापासून निष्ठेने प्रीती करा.
४) १ पेत्र.३:८ – सर्वजण ऐक्याने राहा.
५) रोम.१२:१०अ – बंधुप्रेमाच्या बाबतीत एकमेकांना खरा स्नेहभाव दाखवा.

६) गलती.५:१३ – प्रीतीने एकमेकांची सेवा करा.

**एकमेकांचा सन्मान करा :**

७) योहान.१३:१४ – तुम्हीदेखील एकमेकांचे पाय धुवा.
८) १ पेत्र.५:५ – एकमेकांची सेवा करण्यासाठी नम्रतारूपी कमरबंद बाधा.
९) फिलिप्पै.२:३ – लीनतेने एकमेकांना आपल्यापेक्षा श्रेष्ठ माना.
१०) इफिस.४:२ – सहनशीलता दाखवून एकमेकांना प्रीतीने वागवून घ्या.
११) रोम.१५:७ – ख्रिस्ताने तुमचा आमचा स्वीकार केला, तसे एकमेकांचा स्वीकार करा.
१२) रोम.१२:१० – एकमेकांचा आदर करा (व.१०ब)
१३) इफिस.५:२१ – एकमेकांच्या अधीन असा.
१४) फिलिप्पै.२:४ – दुसऱ्यांचे हित पाहा.
१५) मार्क.९:५० – एकमेकांबरोबर शांतीने राहा.

**एकमेकांना क्षमा करा :**

१६) रोम.१४:१३ – एकमेकांना दोष लावू नये.
१७) इफिस.४:३२ – तुम्ही एकमेकांबरोबर उपकारी व कनवाळू व्हा, एकमेकांना क्षमा करा.
१८) कलस्सै.३:१३ – एकमेकांचा सहन करा आणि एकमेकांना क्षमा करा.
१९) रोम.१२:१४–१६ – एकमेकांना आशीर्वाद द्या, एकमेकांसोबतआनंद करा, शोक करा, ऐक्याने राहा.

**एकमेकांना उत्तेजन द्या :**

२०) १ थेस्सल.५:११ – एकमेकांचे सांत्वन करा.
२१) १ थेस्सल.५:११ – एकमेकांची उन्नती करा.
२२) रोम.१४:१९ – एकमेकांची मानसिक व आध्यात्मिक प्रगती घडवा.
२३) गलती.६:२ – एकमेकांची ओझी वाहा.
२४) कलस्सै.३:१६ – परस्परांना सर्व ज्ञानाने शिक्षण द्या व बोध करा.
२५) इब्री.१०:२४ – प्रीती व सत्कर्मे करण्यास उत्तेजन येईल असे एकमेकांकडे लक्ष द्या.
२६) १ पेत्र.४:१० – देवाच्या नानाविध कृपेच्या चांगल्या कामकऱ्यांप्रमाणे एकमेकांची सेवा करा.
२७) इब्री.३:१३ – रोज एकमेकांना बोध करा.
२८) फिलिप्पै.१:४ – एकमेकांसाठी प्रार्थना करा.

**''करू नका'' :**

२९. गलती.५:१५ – एकमेकांविरुद्ध बोलणे.
३०) गलती.५:१५ – एकमेकांना चावू नका व खाऊन टाकू नका.
३१) गलती.५:२६ – पोकळ अभिमान बाळगणारे, एकमेकांना चीड आणणारे व एकमेकांचा हेवा करणारे होऊ नये.
३२) याकोब.५:९ – एकमेकांविषयी कुरकुर करणे.

३३) कलस्सै.३:९ – एकमेकांशी लबाडी करणे.
३४) रोम.१४:१३ – आपण आपल्या भावापुढे अडखळण ठेवू नये.

## चर्चेसाठी प्रश्न

१. ख्रिस्ती महिलेने तिच्या पतीसोबतचे नातेसंबंध कसे ''जपले'' पाहिजेत?

२. ख्रिस्ती व्यक्तींनी त्यांच्या मुलांसमोर आदर्श किंवा कित्ता म्हणून ठेवण्यासाठी महत्त्वाची असणारी अशी कोणती गुणवैशिष्ट्ये पिता या नात्याने देवाने प्रकट केली आहेत?

३. ख्रिस्ती स्त्री तिच्या नातेवाईकांवरील आपली प्रीती कशी व्यक्त करू शकते?

## प्रार्थना

*प्रिय देवा, तुझ्या वचनात सांगितले आहे त्यानुसार इतरांशी चांगले आणि योग्य संबंध ठेवण्यासाठी तुझ्या कृपेने मला सक्षम कर. प्रत्येक नात्याला मी योग्य ते महत्त्व द्यावे आणि इतरांशी असलेल्या माझ्या प्रत्येक वागणुकीद्वारे तुझेच गौरव होऊ दे. आमेन.*

# टिपा

# ७ शिष्या आणि आत्मे जिंकणे

**मुख्य वचन : नीतीसूत्रे ११:३०**

''...जो ज्ञानी असतो तो जिवास वश करतो.''

*विन शिष्यत्व मॅन्युअलमधील हे प्रकरण म्हणजे थेल्मा ब्राऊन यांनी लिहिलेल्या ''आत्मे जिंकण्याच्या सात पायऱ्या –सेमिनार'' या पुस्तकातील अनेक प्रकरणांचे संकलन आहे. भारतातील ज्या स्त्रियांना त्यांनी प्रेरणा दिली त्या त्यांना प्रेमाने ''ममा'' म्हणत. त्यांच्याविषयी अधिक जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्याशी परिचय होण्याची संधी ज्यांना मिळाली त्यांच्यासाठी त्या कशा आणि किती प्रेरणादायी होत्या हे समजून घेण्यासाठी या पुस्तकातील समर्पण हे पान वाचा.*

*ते पुस्तक साक्ष देण्याच्या आणि आत्मे जिंकण्याच्या पद्धती शिकवते. त्यातील सात पाठांना सात पायऱ्या म्हटले आहे. त्यातील पाच पाठांचा या मॅन्युअलमध्ये समावेश करण्यात आला आहे. आत्मे का जिंकावेत याच्या कारणावर पहिल्या प्रकरणात जोर दिला आहे, तर उर्वरित चार प्रकरणांत सुवार्ता सांगण्याच्या प्रभावी पद्धती सांगितल्या आहेत.*

## १ आत्मे जिंकण्याची कारणे

उपदेशक होण्यासाठी थोड्याच लोकांना पाचारण झाले आहे, पण प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीला आत्मे जिंकणारे होण्यासाठी पाचारण झाले आहे. तुम्ही तुमच्या लोकांना/सभासदांना आत्मे जिंकण्याच्या आनंदात आणले पाहिजे.

> ''आत्मे जिंकणे म्हणजे एखाद्या निश्चित किंवा विवक्षित व्यक्तीने निश्चित वेळी एका निश्चित तारणाऱ्याचा स्वीकार करावा म्हणून निश्चितपणे केलेले प्रयत्न.''
>
> **बिली संडे**

## आत्मे जिंकणारी होण्याची कारणे

१. आत्म्याचे मोल (मार्क.८:३५–३८).

२. नरकाची वस्तुस्थिती (लूक.१२:४–५).

३. ख्रिस्ताने प्रत्येक पाप्यासाठी वधस्तंभावर केलेले दुःखसहन (१ पेत्र.३:१८).

४. या जगाची व्यर्थता व मूर्खपण (१ पेत्र.१:२४–२५).

५. आपले पूर्ण कुटुंब स्वर्गात असावे ही इच्छा (१ थेस्सल.४:१६–१७).

६. स्वर्गाचे गौरव (योहान.१४:२–३).

७. विश्वासूपणे आत्मे जिंकणाऱ्या व्यक्तीला मिळणारी वैयक्तिक पारितोषिके (दानी.१२:३).

## वैयक्तिक किंवा सुवार्ता सेविकेच्या पात्रता/गरजा

१. तिचे स्वतःचे तारण झालेले असले पाहिजे, आणि तिला त्याची खात्री असली पाहिजे (२ पेत्र.१:१०–११).

२. तिने शुद्ध/पवित्र जीवन जगावे (२ पेत्र.३:१४).

३. तिने प्रीतीच्या आत्म्याने कार्य/सेवा करावी.

४. तिला पवित्र शास्त्राचे पुरेसे ज्ञान असावे, आणि त्याचा उपयोग कसा करावा हे तिला माहीत असावे (२ तीमथ्य.२:१५).

५. ती प्रार्थनाशील व्यक्ती असावी (इफिस.६:१८).

६. ती पवित्र आत्म्याने परिपूर्ण असावी/भरलेली असावी (इफिस.५:१८).

७. हरवलेल्या आत्म्यांविषयी तिला कळवळा असावा (यहूदा.२३).

## चर्चेसाठी प्रश्न :

वर सांगितलेली प्रत्येक गरज का महत्त्वाची आहे?

# २ साक्ष कशी द्यावी

कोणाचा नाश व्हावा अशी आपल्या प्रभूची इच्छा नाही, तर सर्वांना पश्चात्ताप करावा अशी आहे (२ पेत्र.३:९ब). प्रत्येक व्यक्तीला सुवार्ता ऐकण्याची संधी मिळावी अशी देवाची इच्छा आहे. हे लक्षात ठेवून प्रत्येक विश्वासणाऱ्याने देव संधी देईल तेव्हा साक्ष देण्यासाठी तयार असले पाहिजे.

## साक्ष कशी द्यावी

१. ख्रिस्ताची साक्ष देणारीचे स्वतःचे तारण झाले पाहिजे (रोम.५:९–११).

२. तुमच्या परिवर्तनाविषयी आणि तुमच्या जीवनात झालेल्या बदलाविषयी साध्यासोप्या शब्दांत सांगा (स्तोत्र.५१:१२–१३).

३. तुमच्या प्रार्थनांच्या तुम्हांला मिळालेल्या उत्तरांविषयी सांगा (स्तोत्र.५०:१५).

४. ख्रिस्त तुम्हांला पूर्ण समाधान कसे देतो याविषयी सांगा (स्तोत्र.१०७:८–९).

५. पाप आणि मोहांवर तुम्हांला व्यक्तिशः मिळालेल्या विजयांसंबधी सांगा (१ योहान.५:४–५).

६. पवित्र शास्त्रातील तुमच्या आवडत्या वचनांविषयी सांगा, तसेच आज सकाळी पवित्र शास्त्रातील एखाद्या शास्त्रभागाद्वारे देव तुमच्याशी कसे बोलला ते सांगा.

७. तुमच्या मैत्रिणींना शुभवर्तमान द्या. त्यांना त्याच्याविषयी सांगा (रोम.१:१६).

८. त्यांना येण्याचे आणि पाहण्याचे आमंत्रण द्या (योहान.१:२९–५१).

९. येशूचे अनुसरण करा (मत्तय.४:१२–२७; मार्क.१:१६–२०).

## ख्रिस्ताला कबूल करण्यामधील अडखळणे

१. माणसाची भीती (२ तीमथ्य.१:७; १ योहान.४:१८; फिलिप्पै.४:१३).

२. लाज वाटणे (२ तीमथ्य.१:८).

३. अशुद्ध/पापी जीवन (१ योहान.१:९).

***टीप : साक्ष न देण्यामधील धोके समजून घेण्यासाठी यहेज्केल ३३:८ वाचा!***

## तुमची वैयक्तिक साक्ष तयार करा

ख्रिस्तासोबतचे तुमचे संबंध आणि त्याचा तुमच्या जीवनावर झालेला परिणाम यांविषयी तुमची स्वतःची साक्ष हे ख्रिस्ताविषयी साक्ष देण्याचे सर्वांत शक्तीशाली साधन आहे. आंधळ्या माणसाने आरोग्य मिळाल्यावर धर्मपुढाऱ्यांना साक्ष दिली की, ''मला एक गोष्ट ठाऊक आहे की, मी पूर्वी आंधळा होतो व आता मला दिसते'' (योहान.९:२५ब). सिद्धान्त किंवा दृष्टीकोनासंबंधी वाद घालण्याच्या इच्छेने काहीजण शास्त्रवचनाला विरोध करतील, पण ज्या व्यक्तीचे जीवन ख्रिस्ताने बदलले आहे त्याची/तिची साक्ष नाकारणे, तिचे खंडन करणे मात्र कठीण आहे.

## तुमच्या वैयक्तिक साक्षीचे घटक

१. तुम्ही ख्रिस्ती होण्यापूर्वी तुमचे जीवन कसे होते ते सांगा. ख्रिस्ताकडे येण्यापूर्वी तुमचे जीवन कसे होते हे सांगा. अविश्वासणाऱ्यांच्या जीवनात सर्रास आढळणाऱ्या अशांती, रितेपणा, निराशा या बाबी तुमच्या जीवनात कशा होत्या यांवर विशेष जोर द्या. पापी जीवनाला गौरव दिले जाऊ नये म्हणून एखाद्या विशिष्ट पापावर जोर न देण्याची खबरदारी घ्या.

२. येशूविषयी तुम्ही कधी आणि कोठे ऐकले आणि त्याला तुमचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकारण्याचा निर्णय तुम्ही का घेतला हे सांगा. तुमच्या पापी जीवनाची आणि तुम्हांला तारणाऱ्याची गरज आहे याची खात्री तुम्हांला कशी झाली याचे वर्णन करत असताना, ज्याला/जिला तुम्ही साक्ष देत आहात त्याच्या/तिच्या जीवनातही पवित्र आत्म्याने खात्री पटवून त्यांना पापांचा पश्चात्ताप करण्याची प्रेरणा द्यावी म्हणून प्रार्थना करा.

३. ख्रिस्ती झाल्यापासून तुमचे जीवन कसे बदलले ते सांगा. स्वर्गाच्या राज्याचे नागरिक या नात्याने तुम्हांला मिळालेला आनंद आणि शांती यांविषयी सांगा. देवाने तुमचे जीवन नक्की कसे बदलले ते सांगा.

४. पवित्र शास्त्रवचनाचा उपयोग करा.

**स्वाध्याय**

वरील प्रत्येक मुद्द्याविषयी छोटासा परिच्छेद लिहा. तुमची साक्ष सुस्पष्ट आणि प्रभावी कशी करावी हे देवाने तुम्हांला दाखवावे म्हणून त्याला विनंती करा.

## टिपा

# ३ *पाच बोटांच्या साहाय्याने सुवार्ताप्रसार*

सुवार्ताप्रसाराच्या या सोप्या पद्धतीमध्ये कोणत्याही विशेष साहित्याची किंवा पुस्तकाची गरज नसते. एका हाताच्या बोटांचा उपयोग करून तारणाची योजना समजावून सांगितली जाते. या पद्धतीत तुम्ही वचने पाठ करण्याची गरज असते, पण त्यामुळे तुम्ही कधीही सुवार्ता सांगण्यास नेहमी सिद्ध असता म्हणून ही पद्धत सर्वांत व्यावहारिक किंवा उपयुक्त आहे. ऐकणाऱ्या व्यक्तीची इच्छा असेल, आणि तसे करणे तुम्हा सयुक्तिक वाटत असेल, तर त्या व्यक्तीच्या हाताचे प्रत्येक बोट धरून, तुम्ही काय सांगत आहात त्याचा अर्थ स्पष्ट करणे उचित होईल.

**१ पहिले बोट – देव तुमच्यावर प्रीती करतो (योहान.३:१६)**

*"देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे."*

**२ दुसरे बोट – सर्वांनी पाप केले आहे (रोम.३:२३).**

"सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत."

**३ तिसरे बोट – तुमच्या पापांचा दंड भरण्यासाठी ख्रिस्त मरण पावला (१ करिंथ.१५:३–४).**

*"शास्त्राप्रमाणे ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांबद्दल मरण पावला; तो पुरला गेला; शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी त्याला पुन्हा उठवण्यात आले."*

**४ चौथे बोट – ख्रिस्त तुमच्या पापांसाठी मरण पावला यावर विश्वास ठेवा (योहान.१:१२).**

*"परंतु जितक्यांनी त्याचा स्वीकार केला तितक्यांना म्हणजे त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्यांना त्याने देवाची मुले होण्याचा अधिकार दिला;"*

**५ पाचवे बोट – तुम्ही विश्वास ठेवता तेव्हा तुम्हांला सार्वकालिक जीवन मिळते (रोम.६:२३).**

*"कारण पापाचे वेतन मरण आहे. पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे."*


१. देव तुमच्यावर प्रीती करतो

२. सर्वांनी पाप केले आहे.

३. तुमच्या पापांचा दंड भरण्यासाठी येशू ख्रिस्त मरण पावला.

४. येशू ख्रिस्त तुमच्या पापांसाठी मरण पावला यावर विश्वास ठेवा.

५. तुम्ही येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवता तेव्हा तुम्हांला सार्वकालिक जीवन मिळते.



निर्णय घेण्यासाठी श्रोत्याला उत्तेजन द्या आणि त्याच्या/तिच्या तारणासाठी प्रार्थना करा.

## टिपा

# ४ तारणाचा रोमकरांस पत्रातील मार्ग

रोमकरांस पत्रातील वचनांचा उपयोग करून तारणाच्या मार्गाचे स्पष्टीकरण करता येईल. टप्प्याटप्प्याने किंवा अनुक्रमाने या मार्गावर गेल पाहिजे, तसेच तुमच्या पवित्र शास्त्रातील ही वचने अधोरेखित करणे उपयुक्त ठरेल. साक्ष देण्याच्या या पद्धतीचा मुख्य फायदा असा की, सर्व वचने केवळ एकाच पुस्तकात असल्यामुळे ती शोधणे सोपे आहे. चौथा मुद्दा सांगून झाल्यावर, "तुमचा तारणारा म्हणून तुम्ही ख्रिस्ताचा स्वीकार करावा यासाठी प्रार्थना करू का?" असे तुमच्या श्रोत्याला विचारा.

१ **मनुष्याची गरज (रोम.३:२३)**. सर्वांनी पाप केले आहे आणि सर्वांना पापक्षमेची गरज आहे.

*"सर्वांनी पाप केले आहे आणि ते देवाच्या गौरवाला उणे पडले आहेत."*

२ **पापाची शिक्षा (रोम.६:२३)**. पापाचे वेतन मरणआहे.

*"कारण पापाचे वेतन मरण आहे. पण देवाचे कृपादान आपल्या प्रभू येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे."*

३ **देवाने केलेली तरतूद (रोम.५:८)** येशूच्या मरणाच्या द्वारे देवाने पापाचा दंड भरण्याची तरतूद केली.

*"परंतु देव आपल्यावरच्या स्वतःच्या प्रीतीचे प्रमाण हे देतो की, आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला."*

४ **मनुष्याचा प्रतिसाद (रोम.१०:९)** पाप कबूल करणे, ख्रिस्तावर विश्वास ठेवणे आणि पापक्षमेचा स्वीकार करणे.

*"येशू प्रभू आहे असे जर "तू आपल्या मुखाने" कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा "आपल्या अंत:करणात" विर्श्वास ठेवशील तर तुझे तारण होईल."*

**स्वाध्याय**

तुमच्या पवित्र शास्त्रात या चार वचनांवर खुणा करा आणि ती पाठ करा.

# ५ शब्दरहित पुस्तक

तुमचे पवित्र शास्त्र आणि हे सुंदर पुस्तक यांच्या सहाय्याने तुम्ही कोणालाही तारणाचा संदेश सांगू शकता! संबंधित व्यक्तीला तुमच्याशी संवाद साधू द्या, म्हणजे तुमच्या दोघांमध्ये संभाषण होऊ द्या. कंसात दिलेली शास्त्रवचने ही तुमच्या अभ्यासासाठी आहेत. साक्ष देताना वापरावीत म्हणून काही वचनांचा उल्लेख केलेला आहे. तुमचा स्वतःचा परिचय देऊन आणि समोरच्या व्यक्तीचे नाव विचारून संभाषणाला सुरुवात करा, म्हणजे तुम्ही सादरीकरण करीत असताना त्या व्यक्तीचे नाव घेऊन त्याच्याशी बोलू शकाल. ही कथा उत्साहाने सांगायला विसरू नका. तुमच्या श्रोत्यासाठी ती तारणाचा मार्ग आहे!

## कथा

शब्द किंवा चित्र नसलेले एखादे पुस्तक तुम्ही पाहिले का? (रंग दाखवत पुस्तकाची पाने उलटा). ज्याने या जगाची निर्मिती केली त्या सत्य व जिवंत देवाची पवित्र शास्त्रातील सुंदर कथा हे रंगीत पानांचे पुस्तक सांगते. माझ्या या पुस्तकाला मी शब्दरहित पुस्तक म्हणतो. प्रत्येक रंग मला कथेच्या एका भागाची आठवण करून देतो. तुम्हांला ही गोष्ट ऐकायला आवडेल का? (प्रतिसादासाठी थांबा).

***सोनेरी पान उघडा***

(देवाच्या प्रीतीवर जोर देऊन सोनेरी पानापासून सुरुवात करणे सुज्ञपणाचे ठरते असे अनुभवांती सिद्ध झाले आहे.)

हे सोनेरी पान मला स्वर्गाची आठवण करून देते. स्वर्ग म्हणजे काय हे तुम्हांला माहीत आहे का? (प्रतिसादासाठी थांबा). स्वर्ग हे देवाचे घर आहे. पवित्र शास्त्र आपल्याला सांगते की, स्वर्गातील रस्ते शुद्ध, पारदर्शक काचेसारख्या सोन्याचे आहेत (प्रकटी.२१:२१). देव त्याच्या घराविषयी अनेक गोष्टी आपल्याला सांगतो. तेथे कोणी कधी आजारी पडत नाही. कोणी कधी मरत नाही. तेथे रात्र नसते. स्वर्गातील प्रत्येक व्यक्ती नेहमी पूर्णपणे आनंदी, सुखी असेल (प्रकटी.२१:४–२३). स्वर्गाविषयीची सर्वांत सुंदर गोष्ट म्हणजे देव पिता आणि त्याचा पुत्र, प्रभू येशू तेथे आहेत.

देवाने सर्व काही निर्माण केले. त्याने तुम्हांला देखील निर्माण केले, आणि तो तुमच्यावर

खूप प्रीती करतो. पवित्र शास्त्र सांगते, ''देवाने जगावर एवढी प्रीती केली की,... (योहान.३:१६). याचा अर्थ असा की तो प्रत्येक व्यक्तीवर प्रीती करतो. यात तुमचा आणि माझाही समावेश आहे. देवाने तुम्हांला निर्माण केले आहे आणि तो तुमच्यावर प्रीती करतो म्हणून तुम्ही त्याच्या कुटुंबाचा घटक व्हावे आणि एके दिवशी त्याच्याबरोबर स्वर्गात यावे (योहान.१४:२) असे त्याला वाटते. स्वर्ग ही किती खास जागा आहे! ती परिपूर्ण आहे, कारण देव परिपूर्ण आहे. पण अशी एक गोष्ट आहे की जी स्वर्गात कधीही असू शकणार नाही.

### काळे पान उघडा

*(श्रोत्याच्या आध्यात्मिक गरजेवर जोर देण्यासाठी या पानाचा उपयोग करा. तुम्ही पापाविषयी बोलत असताना, पवित्र आत्म्याने त्याची खात्री पटवावी म्हणून प्रार्थना करा.)*

ती एक गोष्ट म्हणजे पाप. हे काळे पान मला पापाची आठवण करून देते. तुम्ही आणि मी पापी असल्यामुळे आपण देवाच्या इच्छेऐवजी आपलीच इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. आपली स्वतःचीच इच्छा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे हे पाप आहे. वाईट गोष्टी करणे, बोलणे किंवा विचार करणे हे पाप आहे. पाप म्हणजे देवाने त्याच्या पुस्तकात, पवित्र शास्त्रात जे नियम सांगितले आहेत ते मोडणे. पापामुळे आमच्या जगात दुःख येते. पाप असणाऱ्या इतर काही गोष्टी तुमच्या लक्षात येतात का? (त्यांच्या प्रतिसादासाठी थांबा.) तुम्ही पापी आहात हे तुम्हांला माहीत आहे का? देवाचे वचन म्हणते, ''कारण सर्वांनी पाप केले आहे'' (रोम.३:२३). सर्व म्हणजे आपल्यापैकी प्रत्येकजण, त्यात तुमचा आणि माझाही समावेश आहे. पाप तुम्हांला आणि मला देवापासून विभक्त करते, कारण तो पूर्णपणे योग्य आहे, त्याच्याठायी कसलेही पाप नाही. देव त्याच्या सान्निध्यात पापाला येऊ देत नाही.

देवाने सांगितले आहे की, पापाला शिक्षा झालीच पाहिजे. मरण – देवापासून कायमचे विभक्त होणे (रोम.६:२३) ही पापाची शिक्षा आहे. तुमच्या पापापासून सुटण्यासाठी तुम्ही काहीही करू शकत नाही हे देवाला माहीत होते. देवाला संतुष्ट करण्याइतके चांगले तुम्ही होऊ शकणार नाही हे त्याला माहीत होते. पण तो तुमच्यावर प्रीती करतो आणि तुम्ही त्याचे मूल व्हावे अशी त्याची इच्छा आहे. म्हणून तुम्हांला पापक्षमा मिळावी यासाठी त्याने एक मार्ग तयार केला.

## लाल पान उघडा

*(ख्रिस्ताच्या मृत्यूद्वारे तारणाचा मार्ग यावर जोर देण्यासाठी हे पान वापरा.)*

हे लाल पान मार्ग दाखवते. देव तुमच्यावर खूप प्रीती करतो. त्याने त्याच्या स्वतःच्या पुत्राला, प्रभू येशू ख्रिस्ताला स्वर्गातून पृथ्वीवर पाठवले. लहान बाळ म्हणून तो जन्मला. तो वाढून मोठा झाला. पृथ्वीतलावरील कुठल्याही माणसापेक्षा येशू निराळा होता. त्याने कधीही चूक केली नाही. तो परिपूर्ण आहे. पण एके दिवशी दुष्ट माणसांनी प्रभू येशूच्या डोक्यावर काट्यांचा मुगूट ठेवला, आणि त्याला वधस्तंभावर खिळले. पवित्र शास्त्र सांगते की, तो वधस्तंभावर टांगलेला असताना देवाने तुमची सर्व पापे त्याच्यावर लादली (यशया ५३:६). तुमचा सर्व राग, तुमच्या सर्व लबाड्या आणि तुमचा सर्व दुष्टपणा – तुमची सर्व पापे देवाच्या पुत्रावर लादली होती.

येशू वधस्तंभावर खिळलेला होता तेव्हा त्याच्या हातातून आणि पायातून काय आले? (रक्त.) पवित्र शास्त्र सांगते की, रक्त दिल्याशिवाय पापक्षमा होत नाही (इब्री.९:२२). पापासाठी तुम्हांला मिळणारी मृत्यूची शिक्षा येशूने स्वतःवर घेतली. त्याने खूप दुःख सहन केले. मग तो मोठ्याने ओरडला, ‘‘पूर्ण झाले आहे.’’ आमची पापाची शिक्षा स्वतः वर घेण्यासाठी येशू जगात आला. आणि वधस्तंभावर मरण पावल्यावर त्याने ते कार्य पूर्ण केले. पवित्र शास्त्र म्हणते, ‘‘ख्रिस्त तुमच्याआमच्या पापांसाठी मरण पावला; तो पुरला गेला’’ (१ करिंथ.१५:३,४). पण तीन दिवसांनंतर सर्वांत अद्‌भुत घटना घडली. देवाने त्याला पुन्हा जीवन दिले. त्याने येशूला मेलेल्यांतून उठवले. येशू जिवंत तारक आहे (१ करिंथ.१५:४). तुमचा तारक व्हावे, तुमच्या पापांपापासून तुमचे करावे अशी त्याची इच्छा आहे.

(त्यांना निर्णय घ्यायला सांगा आणि त्याने/तिने ख्रिस्ताला स्वीकारावे म्हणून त्यांना प्रार्थनेचे आमंत्रण द्या.)

## पांढरे पान उलटा

*(श्रोत्याची भूमिका काय म्हणजे आपला वैयक्तिक तारणारा म्हणून त्याने प्रभू येशूवर विश्वास ठेवावा यावर जोर देण्यासाठी या पानाचा उपयोग करा.)*

तुम्ही पापापासून शुद्ध होऊ शकता (स्तोत्र.५१:७) याची आठवण हे पान मला करून देते. (संबंधित व्यक्तीला संपूर्ण वचन तुमच्यासोबत वाचू द्या.) ‘‘देवाने जगावर एवढी प्रीती केली

की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे.'' होय, देव तुमच्यावर प्रीती करतो. देव म्हणतो की, तुम्ही जर येशूवर विश्वास ठेवाल तर तुमचा नाश होणार नाही – तुम्ही सर्वकाळासाठी देवापासून विभक्त होणार नाही. तो तुमच्या पापांची क्षमा करील आणि त्याच्या दृष्टीने तुम्हांला शुद्ध करील. देव म्हणतो, ''जो कोणी विश्वास ठेवतो.'' ''जो कोणी''च्या ठिकाणी आम्ही तुमचे नाव घालू शकतो. तुम्ही तारणारा म्हणून येशूवर विश्वास ठेवाल तर तो तुम्हांला सार्वकालिक जीवन देईल. स्वर्गात देवाबरोबर राहण्यासाठी तुम्हांला त्या प्रकारच्या जीवनाची गरज आहे. आपला तारणारा म्हणून तुम्ही प्रभू येशूवर विश्वास ठेवाल, तर तो तुमच्या पापांची क्षमा करील. आणि तो तुमच्यासोबत नेहमी राहील आणि देवाच्या आज्ञा पाळण्यासाठी तुम्हांला शक्ती देईल. तुम्ही आज येशूला सांगू शकता की, तुम्ही पाप केले आहे आणि तुमच्यासाठी तो मरण पावला असा विश्वास ठेवता. पवित्र शास्त्र सांगते की, जर तुम्ही तुमच्या पापांचा पश्चात्ताप कराल म्हणजे तुमच्या पापापासून मागे वळाल तर तुमची पापे धुतली जातील (प्रे.कृ.३:१९). तसेच ते हेही सांगते की, तुम्ही जर प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवाल, तर तुमचे तारण होईल (प्रे. कृ.१६:३१). आता तुम्हांला माझ्यासोबत तसे करायला आवडेल का? (श्रोत्याचे उत्तर होय असेल तर त्याने/तिने ख्रिस्ताला आपला तारणारा म्हणून स्वीकारावे म्हणून प्रार्थना करा.)

## हिरवे पान उलटा

*(या पानावर आध्यात्मिक वाढ यावर जोर द्या.)*

हिरवा रंग हा मला पाने, फुले, गवत, झाडे यांसारख्या वाढणाऱ्या गोष्टींची आठवण देतो. तुम्हांला देवाकडून मिळालेल्या नवीन जीवनाची, सार्वकालिक जीवनाची आठवण हे पान मला करून देते. पापापासून तुमचे तारण करणारा म्हणून तुम्ही प्रभू येशूवर विश्वास ठेवता, तेव्हा तुम्ही देवाच्या कुटुंबात नवीन जन्मलेल्या बाळासारखे असता. तुम्ही विशेष प्रकारे वाढावे अशी देवाची इच्छा आहे. पवित्र शास्त्र तुम्हांला सांगते की, ''आपला प्रभू व तारणारा येशू ख्रिस्त ह्याच्या कृपेत व ज्ञानात वाढत जा'' (२ पेत्र.३:१८).

पवित्र शास्त्रातून तुम्ही येशूविषयी अधिक शिकत जाल तेव्हा पापापासून दूर कसे राहावे हे शिकाल (स्तोत्र.११९:११). त्याच्या आज्ञा पाळण्यासाठी त्याने तुम्हांला मदत करावी म्हणून रोज त्याला विनंती करीत जा. तुम्ही एखादे पाप केले तर देवाला सांगा. तो त्याच क्षणी तुम्हांला क्षमा करील. पवित्र शास्त्र सांगते की, ''जर आपण आपली पापे

पदरी घेतली, तर तो विश्वसनीय व न्याची आहे म्हणून आपल्या पापांची क्षमा करील, व आपल्याला सर्व अनीतीपासून राखील'' (१ योहान.१:९). ती चूक तुम्ही पुन्हा करू नये म्हणून त्याला मदतीची विनंती करा.

*(देवाने दिलेल्या मदतीच्या अभिवचनाबद्दल त्याचे उपकार मानायला त्या व्यक्तीला मदत करा.)*

१. देवाशी बोला – प्रार्थना (१ थेस्सल.५:१७). पवित्र शास्त्र निरंतर प्रार्थना करायला सांगते.

२. देवाचे ऐका – वाचन करून आणि पाठ करून देवाचे वचन शिका (स्तोत्र.११९:११)

३. देवाविषयी बोला – इतरांना त्याच्याविषयी सांगा किंवा साक्ष द्या (मार्क.१६:१५).

४. देवाची भक्ती करा – संडेस्कूल (शब्बाथ शाळा) आणि चर्चला जा (इब्री.१०:२५).

## ती व्यक्ती तुमच्यापासून निघून जाण्यापूर्वी

१. त्याला एखादी हस्तपत्रिका किंवा पत्राद्वारे करायचा शास्त्रभ्यास द्या.

२. प्रभू येशू ख्रिस्ताने त्याच्यासाठी जे काही केले त्याबद्दल त्याला आभार मानायला सांगा.

३. त्याच्यासाठी प्रार्थना करा.

४. त्याचा पाठपुरावा करता यावा म्हणून त्याचे नाव आणि पत्ता लिहून घ्या.

(शब्दरहित पुस्तकातील सूचना या चाईल्ड इव्हँजेलिजम फेलोशिपच्या सौजन्याने मिळाल्या आहेत.)

## चर्चेसाठी प्रश्न :

१. तुमच्या दृष्टीने सुवार्ता सांगण्याची सर्वांत प्रभावी पद्धत कोणती आणि का?

२. साक्ष देण्यासाठी शब्दरहित पुस्तक तुम्ही कोणकोणत्या ठिकाणी आणि कोणकोणत्या वेळी वापरू शकता?

**प्रार्थना**

*स्वर्गीय पित्या, सुवार्ता सांगण्याच्या आणि साक्ष देण्याच्या या पद्धती शिकण्यासाठी आणि पाठ करण्यासाठी मला मदत कर. ज्यांना ऐकण्याची इच्छा आहे, आणि तारणाचा स्वीकार करण्यासाठी ज्यांची अंतःकरणे मृदू, तयार आहेत असे लोक माझ्याकडे पाठव. आमेन.*

# *टिपा*

# ८ शोमरोनी स्त्री
## आत्मे जिंकणारी/साक्ष देणारी

**मुख्य वचन : रोम.१:१६**

*''कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही; कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला – प्रथम यहूद्याला मग हेल्लेण्याला – तारणासाठी ती देवाचे सामर्थ्य आहे.''*

### शोमरोनी स्त्रीविषयीचा शास्त्रभाग : योहान.४:४–४२

### प्रस्तावना

१. देवाच्या योजनेनुसार पवित्र आत्म्याने येशूला शोमरोनातून नेले.

२. शोमरोनी लोकांनी विदेश्यांसोबत विवाह केले होते, म्हणून ते यहूद्यांप्रमाणे शुद्ध वंशाचे नव्हते. त्यामुळे यहूदी लोक त्यांना तुच्छ, हलके मानत होते. त्यांच्याशी कसल्याही प्रकारचा संपर्क येऊ नये म्हणून यहूदी प्रवासी शोमरोनाला वळसा घालून –सहा दिवसांचा प्रवास करून – जात असत.



३. एका महिलेचे जीवन बदलणारी भेट घेण्यासाठी येशू ४२ मैलांची वाट

चालून गेला. यावरून स्त्रियांच्या जीवनांना येशू खूप महत्त्व देत होता हे सिद्ध होते.

## शोमरोनी स्त्रीच्या जीवनावरून स्पष्ट होणारी आत्मे जिंकणाऱ्या व्यक्तीची गुणवैशिष्ट्ये

### १. आत्मे जिंकणारी महिला ही जिला ख्रिस्तामधील तारण मिळाले आहे, अशी पापी स्त्री असते (प्रे.कृ.४:१२).

अ. शोमरोनी स्त्री आपणा सर्वांचे दर्शक आहे; पवित्र शास्त्रात तिचे नावसुद्धा सांगितलेले नाही.

ब. तिने अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना केला :

- **वांशिक** – ती शोमरोनी होती (व.९).
- **सामाजिक** – ती व्यभिचारी होती (व.१८).
- **धार्मिक** – यहूद्यांपेक्षा निराळ्या प्रकारे भक्ती करणाऱ्या शोमरोनी वंशाची ती होती (व.२१–२३).
- तिच्याशी बोलताना येशूने या अडखळणांकडे दुर्लक्ष केले (व.७).

क. तिच्यासमोर गंभीर नैतिक समस्या होत्या (व.१६–१८).

- ती पापाची दयनीय गुलाम होती.
- तिचे नातेसंबंध तिच्या अंतःकरणातील तीव्र लालसा, इच्छा पूर्ण करू शकले नाहीत (स्तोत्र.३८:४).

ड. येशू ख्रिस्तासोबतच्या एका भेटीतच तिचे जीवन कायमचे बदलून गेले.

- तिच्या सर्व प्रश्नांची उत्तरे येशूने शांतपणे दिली (व.१२–२६).
- येशूने तिला सत्यापर्यंत आणले (व.२४)
- तिला असणारी तारऱ्याची गरज येशूने पूर्ण केली (व.२६).

इ. तिला ज्या गोष्टीची सर्वांत जास्त गरज होती ती गोष्ट म्हणजे तारण, नवीन जीवन तिला द्यायला येशू आला. येशू ख्रिस्ताने तिच्याशी ज्या प्रकारे संभाषण केले, प्रभावीपणे आत्मे जिंकणाऱ्यासाठी एक उदाहरण आहे.

- येशूने तिचे अस्तित्व बदलले – तिने सर्व अडखळणे पार केली आणि ज्या लोकांनी तिच्यावर बहिष्कार घातला होता त्यांनाच सुवार्ता

सांगायला गेली (व.२८–२९).

- येशूने तिचे सेवाकार्य बदलले – आता साक्ष देणे हा तिचा प्राथमिक हेतू होता (व.३९).
- येशूने तिची परिस्थिती बदलली – तिच्या संपूर्ण गावाने विश्वास ठेवला (व.४२).
- सरशेवटी, येशू विश्वासणाऱ्यांना त्याची प्रत्यक्ष सहभागिता, त्याचे सान्निध्य देतो (निर्गम ३३:१४; मत्तय.१:२३), त्यामुळे ते आत्मे जिंकणारे होतात.

२. **आत्मे जिंकणारी ही येशू जो जिवंत पाणी त्याच्यामध्ये तृप्त, संतुष्ट झालेली विश्वासणारी असते (योहान.४:१०–१५).**

अ. विश्वासणाऱ्यांना येशूमध्ये खरी तृप्ती, खरे समाधान मिळते, कारण तो त्यांना सार्वकालिक मृत्यूपासून सोडवण्यासाठी देवाने दिलेली देणगी आहे (व.१०; तसेच योहान.३:१६; २ करिंथ.९:१५ पाहा). ज्याला/जिला हे समाधान मिळते तो/ती ही सुवार्ता इतरांना सांगण्यासाठी उत्सुक असतो/असते (व.२८–२९).

ब. पाणी जीवनासाठी अत्यावश्यक आहे. मनुष्याचे शरीर आणि पृथ्वी ही साधारणपणे ७०% पाण्याने भरलेली आहे. येशू जे तारण देतो त्याद्वारे विश्वासणाऱ्यांना येशूमध्ये जे समाधान, जी तृप्ती मिळते तिचे स्पष्टीकरण करण्यासाठी येशूने विहिरीतील पाण्याचे उदाहरण दिले. येशू पूर्ण समाधान देतो, कारण तो :

- **जिवंत पाणी आहे** (व.१०). येशू सार्वकालिक जीवन देतो (व.१४).
- **तृप्त करणारे पाणी** (व.१३) आमची आध्यात्मिक तहान केवळ येशू ख्रिस्ताद्वाचे भागवली जाते. जी महिला त्याच्याकडे येते ती कधीही आध्यात्मिकरित्या भुकेली राहणार नाही, आणि जी त्याच्यावर विश्वास ठेवते ती आध्यात्मिकदृष्ट्या कधीही तहानेली राहणार नाही (योहान.६:३५).
- **शुद्ध करणारे, जीवन बदलणारे पाणी** (व.१६–१९). शोमरोनी स्त्रीची

येशूबरोबर झालेल्या भेटीने तिचे जीवन पूर्णपणे बदलून गेले, ती पापापासून शुद्ध झाली. हा बदल दिसू शकतो, कारण सामाजिकदृष्ट्या जरी तिला वाळीत टाकले होते (दुपारी एकटीनेच विहिरीवर पाणी भरायला यावे लागले), तरी ती संपूर्ण गावाला ख्रिस्ताची वार्ता सांगण्यासाठी गेली (व.२८–२९). आजदेखील येशूचे रक्त आपल्याला सर्व पापांपासून शुद्ध करते आणि आपल्याला नवी उत्पत्ती बनवते (२ करिंथ.५:१७).

- **ओसंडून वाहणारे पाणी (व.१४).** येशू जे पाणी (समाधान) देतो, ते विश्वासणाऱ्यामध्ये ओसंडून वाहणाऱ्या पाण्याचा झरा होते (योहान.७:३७–३९). विश्वासणारे पवित्र आत्म्याचा स्वीकार करतात, तेव्हा येशू त्यांच्यामध्ये जीवनाचा अखंड स्रोत बनतो.

क. शोमरोनी स्त्रीप्रमाणे, विश्वासणारी स्त्री जीवनाचे पाणी प्याली आहे (तिला येशू ख्रिस्तामध्ये तारण मिळाले आहे) हे तिच्या जीवनातून दिसले पाहिजे. ओसंडून वाहणाऱ्या पाण्याची हे बुडबुडे इतरांवरून वाहिले पाहिजेत, जेणेकरून तिला अधिकाधिक लोकांना सुवार्ता सांगता येईल.

३. **आत्मे जिंकणाऱ्याकडे संदेश असतो (योहान.४:२९)**. आत्मे जिंकणाऱ्या महिलेचे येशूद्वारे तारण झालेले असते, आणि ती त्याच्यामध्ये सतत संतुष्ट असते, म्हणून तिच्याकडे सांगण्यासाठी संदेश असतो :

अ. **सत्याचा** संदेश : (''चला, मी केलेले सर्वकाही ज्याने मला सांगितले, तो मनुष्य पाहा...'' (व.२९). येशूने जे काही सांगितले ते सर्व खरे आहे याची तिला पूर्ण जाणीव होती. येशू जो सत्य आहे त्याचा संदेश आपल्याकडे आहे (योहान.१४:६).

ब. **आशेचा** संदेश : ''...तोच ख्रिस्त असेल काय?'' (व.२९). मशीहा त्यांच्या गावात आल्याची चांगली वार्ता तिच्याकडे होती. आध्यात्मिक अंधार, नियम आणि नियंत्रणे यांच्या कचाट्यात सापडलेले शोमरोनी लोक आतुरतेने मशीहाची वाट पाहत होते. तिने त्यांना आशेचा संदेश सांगितला : तो मशीहा असू शकेल! होय, तो खरेच मशीहा आहे (व.२६)!

क. **आव्हानदायी** संदेश : ''...तोच ख्रिस्त असेल काय?'' (व.२९). त्यांनी विचार करावा आणि कृती करावी म्हणून ती त्यांची उत्सुकता चाळवत होती.

ड. **आमंत्रणाचा** संदेश : ''चला, ... तो मनुष्य पाहा...'' (व.२९). सत्य, आशा आणि आव्हानाचा संदेश देऊन तिने त्यांना येशूकडे येऊन व्यक्तिशः त्याचा अनुभव घेण्याचे आमंत्रण दिले.

## ४. आत्मे जिंकणारी महिला साक्ष देण्यास उत्सुक असते (योहान.४:२८)

**ती अशी आहे :**

अ. **आनंदी (व.२८)**. शोमरोनी स्त्रीला इतका आनंद झाला की, आपली घागर तेथेच टाकून ती गेली! तिला जिवंत पाणी (येशू) मिळाले होते, ती शुद्ध झाली होती, तृप्त झाली होती आणि सार्वकालिक प्राप्तीचा आनंद तिच्यातून ओसंडून वाहत होता.

ब. **धाडसी, निर्भय (व.२८)**. तिच्या स्वतःच्या नगरात ती बदनाम होती, तरीदेखील ती त्याच नगरात गेली. ज्यांनी तिच्यावर बहिष्कार टाकला होता त्यांच्याकडेच ती गेली.

क. **धीट (व.२९).** तिने त्यांना आव्हान दिले, ''या आणि पाहा.'' येशू हाच ख्रिस्त असेल असे तिने जाहीर केले आणि त्यांनी त्याच्याकडे यावे म्हणून त्यांच्यात उत्सुकता निर्माण केली.

ड. **लज्जाहीन, निर्लज्ज (व.२९).** तिने म्हटले, ''मी केलेले सर्वकाही ज्याने (त्याने) मला सांगितले.'' असे विधान करून तिने, येशूने तिला शुद्ध करण्यापूर्वी तिने ज्या गोष्टी केल्या, आणि ज्यांची चर्चा करण्यामुळे ती अडचणीत, पेचात पडली असती, त्या सर्व गोष्टी तिने मान्य केल्या. तिच्यामध्ये झालेल्या परिवर्तनाची साक्ष देण्याची तिला लाज वाटली नाही.

इ. **उत्साही, आवेशी (व.२९)**. तिने ताबडतोब साक्ष दिली. तिने वेळ वाया घालवला नाही. तिने कोणाचा सल्ला घेतला नाही. तिच्या धीटपणाचे काय परिणाम होतील याची तिने पर्वा केली नाही. तिने अगदी योग्य वेळी तिने साक्ष दिली, कारण येशू दुसऱ्या गावाला निघाला होता.

फ. **फ़लदायी (व.३९-४२)** तिच्या साक्षीमुळे तिच्या गावातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी विश्वास ठेवला व ते येशूकडे आले. त्यांचा वैयक्तिक विश्वास असावा म्हणून त्याने त्यांना थोडक्यात शिषत्वाचे शिक्षण दिले.त्यांचा विश्वास ख्रिस्तामध्ये

होता, तिच्यामध्ये नाही. चांगल्या साक्षीदाराचे हे एक लक्षण आहे – लोकांना येशूमधील वैयक्तिक तारणदायी विश्वासामध्ये आणते.

## चर्चेसाठी प्रश्न

१. शोमरोनी स्त्रीच्या पापी जीवनशैलीमुळे तिच्या समाजाने तिचा न्यायकेला. तिला साक्ष देण्यासाठी येशूने हा अडथळा दूर केला. सुवार्ता सांगण्यामध्ये तुमच्या संस्कृतीने निर्माण केलेले अडथळे तुम्ही कसे दूर करू शकाल?

२. शोमरोनी स्त्रीप्रमाणे साक्ष देण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तीची सहा गुणवैशिष्ट्ये कोणती आहेत? तुम्ही साक्ष देण्यासाठी उत्सुक असणारे आहात का? का किंवा नाही?

## प्रार्थना

*प्रभूदेवा, मला फलदायी आत्मे जिंकणारी बनव. आनंदाने पूर्ण होण्यास आणि येशू जो जिवंत पाणी आहे त्याच्याविषयी मला माहिती आहे हे धैर्याने आणि ठामपणे सांगण्यासाठी मला मदत कर. त्यानंतर मला शिष्य बनवणारी होण्यास, आणि मी ज्यांना शिष्य बनवीन त्यांनीही चांगले फळ देणारे व्हावे म्हणून त्यांना साहाय्य करण्यासाठी मला मदत कर. आमेन.*



# ९ नामी आणि रूथ

## चांगल्या शिष्यत्वासाठी संगोपन करणे

**मुख्य वचन : तीत.२:३–४अ**

*''तसेच वृद्ध स्त्रियांनी चालचलणुकीत आदरणीय असावे; त्या चहाडखोर मद्यपानासक्त नसाव्यात; सुशिक्षण देणाऱ्या असाव्यात; त्यांनी तरुण स्त्रियांना असे शिक्षण द्यावे...''*

**शास्त्रभाग : रूथचे पुस्तक**

**प्रस्तावना**

१. शिष्यत्वाच्या तत्त्वाची रचना येशूने केली. त्याने बारा शिष्य निवडले, पण अधिक घनिष्ट शिष्यत्वासाठी त्याने त्यांच्यापैकी तिघाजणांची निवड केली (पेत्र, याकोब आणि योहान). थोडाच काळ ते एकत्र होते, पण तो अतिशय उत्कृष्ट काळ होता.

२. संभाव्य पुढाऱ्यांना वाढण्यासाठी, विकसित होण्यासाठी उत्तेजन देणे, आणि त्यांना सेवाकार्यासाठी सुसज्ज, सक्षम करणे हे शिष्य बनवणाऱ्याचे उद्दिष्ट आहे (२ तीमथ्य.४:१–२). मार्गदर्शक किंवा संगोपन करणारा/करणारी असेही शिष्य करणाऱ्याला म्हणतात. ''सुज्ञ किंवा विश्वसनीय शिक्षक किंवा मार्गदर्शक'' अशी याची व्याख्या केली जाते. ज्याला/जिला मार्गदर्शन केले जाते किंवा संगोपन केले जाते त्याला/तिला ''शिष्य/शिष्या'' म्हटले जाते.

३. पवित्र शास्त्रात रूथच्या पुस्तकात रूथ (शिष्या) आणि नामी (तिची मार्गदर्शक) यांच्यातील संबंधाचा अभ्यास केल्यावर हे तत्त्व स्पष्ट होते.

## चांगल्या मार्गदर्शकाची गुणवैशिष्ट्ये

१. चांगले मार्गदर्शक ***सांस्कृतिक/सामाजिक अडथळ्यांकडे दुर्लक्ष करतात*** (१:३–४). नामी यहूदी होती, तर रूथ मवाबी होती.

अ. वांशिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अडखळणे हा आपल्या दुनियेचा एक भाग आहे, पण या गोष्टी देवाच्या राज्याचा घटक होऊ नयेत.

ब. प्रीती हा देवाच्या राज्याचा नियम आहे. प्रीती आपल्याला लोकांना, जे आपल्यासारखे नाहीत, त्यांनादेखील सुवार्ता सांगण्यास भाग पाडते.

क. संगोपन करण्यासाठी आपण एखाद्या व्यक्तीचा शोध घेतो तेव्हा आपली दृष्टी सांस्कृतिक किंवा वांशिक अडखळणांकडे दुर्लक्ष करणाऱ्या देवाप्रमाणे असली पाहिजे (२ पेत्र.३:९).

२. चांगल्या मार्गदर्शकांकडे ***दृष्टान्त/उद्दीष्ट असते*** (१:६–७). आपण कोठे जात आहोत हे नामीला माहीत होते – ती यहूदा देशात परत येत होती.

अ. आपले गंतव्य स्थान काय आहे म्हणजे आपल्याला निश्चित काय साध्य करायचे आहे हे मार्गदर्शकाला माहीत असले पाहिजे. या संबंधातून सरशेवटी काय साध्य करायचे आहे? (नीती.२९:१८).

ब. शिष्यत्व हे स्वतःमध्ये सुधारणा घडवण्यापेक्षा अधिक आहे; हे कोणाला तरी ख्रिस्तासारखे होण्यासाठी शिकवणे आहे (२ करिंथ.३:१८).

३. चांगले मार्गदर्शक शिष्याला/शिष्येला ***स्वतः निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देतात*** (१:८–९). नामीने अर्पा आणि रूथ यांना निवड करण्याचे स्वातंत्र्य दिले.

अ. काय करावे याची निवड करण्याचा अधिकार देवाने माणसांना दिला (अनु.३०:१९).

ब. मार्गदर्शक किंवा संगोपन करणारा ज्याची/जिची जडणघडण करत आहे, त्याने/तिने काय करावे किंवा आपले स्वतःचे निर्णय त्याच्यावर/तिच्यावर लादणे हे मार्गदर्शकाने कधीही करू नये.

क. चांगला मार्गदर्शक स्पष्टपणे चांगला मार्ग दाखवतो, आणि तो स्वीकारायचा की नाही याची निवड करण्याचे स्वातंत्र्य आपल्या शिष्याला/शिष्येला देतो/देते.

ड. शिष्याकडून चूक झाली तरी मार्गदर्शकाने प्रेमळतेने आणि ठाम राहावे.

४. चांगले मार्गदर्शक ***देवभीरूपणाने, चांगल्या हेतून लक्ष देतात*** (२:१९). रूथने जबाबदार राहण्यास शिकावे म्हणून नामीने तिला उत्तेजन दिले.

अ. मार्गदर्शक आपल्या शिष्यांच्या संपर्कात राहतात, आणि त्यांच्याकडून काही चूक झाल्यास त्यांना सौम्यपणे मार्गदर्शन करतात.

ब. जबाबदार असणे किंवा धरणे हे नियंत्रण ठेवण्यासाठी नाही, तर शिकवण्यासाठी आणि संगोपन करण्यासाठी आहे.

५. चांगले मार्गदर्शक आपले ***ज्ञान आणि सुज्ञता शिष्यांना सांगतात/शिकवतात*** (२:२०). नामीला यहूदी लोकांची संस्कृती आणि रूढीपरंपरा माहीत होत्या– रूथल्या त्या माहीत नव्हत्या. नामीने तिला ही माहिती दिली, आणि योग्य ती पावले उचलण्यासाठी तिला मार्गदर्शन केले.

अ. शिष्या ज्या नवीन जीवनप्रणातील वाटचाल करत आहे, त्यात तिने सुज्ञतेने चालण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन करता यावे म्हणून मार्गदर्शकाने स्वतःच्या ज्ञानात आणि कौशल्यात वाढ केली पाहिजे.

ब. देवाचे वचन जाणणे आणि देवासोबत वेळ घालवणे यांमुळे सुज्ञता मिळते. सेवेच्या आणि जीवनाच्या प्रत्येक बाबतीत देव मार्गदर्शन करील.

क. अंतिमतः शिष्येने त्यांच्या (मार्गदर्शकाच्या) ज्ञानावर आणि सुज्ञतेवर अवलंबून न राहता, देवाच्या ज्ञानावर व सुज्ञतेवर अवलंबून राहण्यास शिकावे हेच चांगल्या मार्गदर्शकाचे उद्दिष्ट असते.

६. चांगले मार्गदर्शक ***चांगला सल्ला देतात*** (२:२२; ३:३–४). नामीने सुज्ञतेने रूथला चांगला सल्ला दिला.

अ. चांगला किंवा दैवी सल्ला हा केवळ देवाच्या वचनातूच मिळतो. शिष्य तयार करत असताना मानवी ज्ञानावर किंवा निरीक्षणावर आधारित सल्ला देऊ नये (नीती.२:६).

ब. चांगल्या सल्लामसलतीमध्ये केवळ सांगणे समाविष्ट नाही, तर ऐकदेखील समाविष्ट आहे (याकोब.१:१९).

क. मार्गदर्शकाच्या देवभीरू जीवनामुळे शिष्येला त्याच्या/तिच्या अधिकाराचा सकारात्मक रीतीने प्रतिसाद देण्यास साहाय्य मिळते.

७. चांगले मार्गदर्शक हे ***सहृदयी, काळजी घेणारे असतात*** (३:१). नामीला रूथच्या कल्याणाची काळजी होती.

अ. मार्गदर्शक ज्यांचे संगापन करत आहेत, त्यांच्यासाठी ते देवाच्या प्रीतीचे प्रवाह आणि प्रतिनिधी आहेत हे त्यांनी (मार्गदर्शकांनी) लक्षात ठेवले पाहिजे.

ब. पापाविरुद्ध निर्भयपणे कडक इशारा देणे आणि कळवळा व मार्दव यांची यांची सांगड घातल्यावर योग्य तो समतोल साधला जातो (इफिस.४:३२).

## चांगल्या शिष्येची गुणवैशिष्ट्ये

१. चांगल्या शिष्या ***त्यांच्या मार्गदर्शकांविषयी आदरभाव बाळगतात*** (१:१४–१७). रूथची नामीवर भक्ती, प्रीती होती. तिला तिची काळजी होती आणि तिच्याविषयी आदरभाव होता.

अ. नामीच्या देवाची भक्ती करण्यासाठी ती तिचा आतापर्यंतचा विधर्मी भक्तीभाव सोडण्यास तयार होती (नीती.२८:१३; प्रे.कृ.३:१९).

ब. रूथने तिच्या आईकडे परत न जाता नामीसोबत जाण्याची इच्छा व्यक्त केली यावरून तिची प्रीती व्यक्त झाली (१ पेत्र.१:२२).

२. चांगल्या शिष्या ***आज्ञाधारक असतात*** (३:५). नामीने रूथला जे जे करायला सांगितले ते सर्व तिने तसेच केले.

अ. आज्ञाधारक हृदय नम्रदेखील असते, आणि शिष्यत्वाच्या यशस्वी संबंधाची ते गुरूकिल्ली असते (स्तोत्र.५१:१०–१२).

ब. जे देवाकडे येतात त्यांनी केवळ विचारांनी नव्हे, तर मनापासून देवाकडे यावे (योहान.४:२४).

३. चांगल्या शिष्यांकडे ***स्वतःच्या कल्पना/विचार असतात*** (२:२). ''मी सरवा वेचण्यासाठी जाऊ का?'' असे रूथने नामीला विचारले.

अ. शिष्यांनी सर्जनशीलतेने विचारा करावा आणि त्यांनी पूर्वी कधीही प्रत्यक्षात आणल्या नसतील अशा नवनवीन कल्पना त्यांच्याकडे असाव्यात (यशया ४३:१९).

ब. एखादी नवीन गोष्ट किंवा कल्पना अपयशी ठरल्यासारखी वाटली, तरी काही ना काही नवीन करण्याचा प्रयत्न करणे हा शिष्यांना शिकण्याचा आणि वाढण्याचा एक मार्ग आहे.

४. चांगल्या शिष्या ***प्रामाणिकपणे इत्थंभूत अहवाल देतात*** (२:१९–२२)

अ. रूथने न घाबरता, न डगमगता नामीच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

ब. तिने प्रामाणिकपणे आणि हातचे राखून न ठेवता उत्तरे दिली. तिला मार्गदर्शन करता यावे म्हणून नामीला ज्या ज्या गोष्टींची माहिती हवी होती ती सर्व माहिती तिने (रूथने) दिली (१ पेत्र.३:१५).

## संगोपनाच्या नात्यामधील आशीर्वाद

१. ***मार्गदर्शक आणि शिष्या दोघेही देवाच्या आशीर्वादाचे वाटेकरी होतात*** (३:१६–१८; ४:१४–१६). नामी रूथच्या आशीर्वादात सहभागी झाली.

अ. संगोपन किंवा मार्गदर्शनाचे अंतिम ध्येय हे देवाच्या राज्यासाठी उपयुक्त असणे हे आहे, आणि सर्वजण या आशीर्वादात एकत्रितरित्या सहभागी होतात.

ब. शिष्येच्या यशाचा मार्गदर्शकाला आनंद झाला पाहिजे, ते कधीही ईर्ष्येचे किंवा मत्सराचे कारण होऊ नये (१ पेत्र.२:१).

क. मग ही शिष्या जेव्हा स्वतःचे मार्गदर्शिका, संगोपन करणारी होते तेव्हा हे आशीर्वाद पुढच्या पिढीकडे गेले पाहिजेत.

२. ***मार्गदर्शक आणि शिष्या हे दोघेही देवाच्या राज्यासाठी आणि इतरांसाठी आशीर्वाद आणतात*** (४:१८–२२). नामी आणि रूथचे नाते, आणि नंतर रूथचा बवाजाशी झालेला विवाह यांमुळे एका नवीन कुटुंबाची स्थापना झाली. त्यामुळे त्यांना मोठा आशीर्वाद आणि आनंद मिळाला. देवाचे लोक ऐक्याने, एकदिलाने काम करतात तेव्हा देवाच्या राज्याला मोठा आशीर्वाद मिळतो (स्तोत्र.१३३:१). रूथ आणि बवाज यांचा वंशज असलेल्या येशूद्वारे संपूर्ण जग आशीर्वादित झाले (१ करिंथ.१५:२२).

## चर्चेसाठी प्रश्न

१. चांगल्या मार्गदर्शकाची महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये कोणती? तुमच्यामध्ये ही गुणवैशिष्ट्ये

आहेत का? यांपैकी कोणता गुण दाखवणे तुम्हांला सर्वांत कठीण वाटते? का?

२. चांगल्या शिष्येची महत्त्वाची गुणवैशिष्ट्ये कोणती आहेत? ही वैशिष्ट्ये तुमच्याठायी आहेत का? यांपैकी कोणता गुण दाखवणे तुम्हांला सर्वांत कठीण वाटते? का?

## प्रार्थना

*प्रभू येशू, तू जे ज्ञान मला दिले आहेस ते मी इतरांना सांगणारा, शिष्यांवर दया, प्रीती करणारा चांगला मार्गदर्शक बनण्यासाठी मला साहाय्य कर. मी कोणाला शिष्य करावे, कोणाचे संगोपन करावे हे कृपा करून मला दाखव, आणि जे लोक मला तुझे मार्ग शिकवत आहेत, त्यांचा मी चांगला आणि विश्वासू शिष्य व्हावे म्हणून मला मदत कर. चांगल्या शिष्यत्वासाठी संगोपनाचे जे संबंध मी जोपासत आहे त्याद्वारे जग आशीर्वादित होऊ दे. आमेन.*



# १० प्रिस्किल्ला : शिष्य बनवणारी

**मुख्य वचन : २ तीमथ्य.४:२**

*''वचनाची घोषणा कर, सुवेळी अवेळी तयार राहा, सर्व प्रकारच्या सहनशीलतेने व शिक्षणाने दोष दाखव, निषेध कर व बोध कर.''*

**प्रिस्किल्लाचा उल्लेख असणारे शास्त्रभाग : प्रे.कृ.१८:१–४,१८–२२, २४–२६; रोम.१६:** ३–४; १ करिंथ.१६:१९; २ तीमथ्य.४:१९

## प्रस्तावना

१. इटलीमधील पंत येथील अक्विल्ला नावाचा यहूदी मनुष्य त्याच्या पत्नीसह करिंथ येथे राहायला आला होता (प्रे.कृ.१८:२). ''सर्व यहूद्यांनी रोम शहर सोडून जावे,'' असे फर्मान सम्राट क्लॉडियस याने इ. स. ५२ साली काढले होते, म्हणून त्यांना रोम शहर सोडून यावे लागले होते. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला यांचा उल्लेख नव्या करारात सहा वेळा करण्यात आला आहे (वरील शास्त्रभाग पाहा).

२. त्यांचा उल्लेख नेहमीच जोडीने करण्यात आला आहे. एकेकट्याचा कधीच नाही.

३. चार ठिकाणी प्रिस्किल्लाचा उल्लेख अगोदर करण्यात आला आहे. पुरुषप्रधान समाजामध्ये महिलेला महत्त्व दिल्याचे हे अनन्यसाधारण उदाहरण आहे.

४. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला यांच्या सेवाकार्याची जी सहा गुणवैशिष्ट्ये खाली दिली आहेत ती, आपण शिष्य करण्यासाठी कठोर मेहनत करणारे कसे असावे हे आपल्याला शिकवतात.

## शिष्य बनवणाऱ्याची सहा गुणवैशिष्ट्ये (प्रिस्किल्लाच्या जीवनावरून स्पष्ट होणारी)

### १. शिष्य बनवणाऱ्याने देवाचे वचन शिकले पाहिजे, आणि त्याचा अभ्यास करत राहिले पाहिजे (प्रे.कृ.१८:१–११,२६).

अ. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला हे समर्पित ख्रिस्ती विश्वासणारे होते हे स्पष्ट आहे.

ब. त्यांची आणि पौलाची भेट घडवण्यासाठी देवाने त्यांच्या तंबू बनवण्याच्या व्यवसायाचा उपयोग केला. करिंथ येथील त्यांच्या घरी अठरा महिने राहून पौलाने त्यांना देवाचे वचन शिकवले.

क. नंतर, ते स्वतःच अपुल्लोला शिकवण्याइतपत तयार झाले. अशा प्रकारे शिष्य असणारी प्रिस्किल्ला शिक्षिका, शिष्य बनवणारी झाली.

ड. प्रिस्किल्लाचे सेवाकार्य हे ती ख्रिस्ताच्या वचनात टिकून राहिली, आणि खरोखरच त्याची शिष्या होती हे दाखवते (योहान.८:३१). शिष्य बनवणारी व्यक्ती ही स्वतःच शिष्या असते आणि आयुष्यभर देवाच्या वचनाची विद्यार्थी असते.

इ. जे पतिपत्नी देवाचे वचन एकत्र शिकवतात, आणि त्याप्रमाणे आचरण करतात ते शिष्य बनवणारी चांगली टीम बनते.

### २. शिष्य बनवणारे आदरतिथ्य करणारे असावेत (प्रे.कृ.१८:३; १८:२६; १ करिंथ.१६:१९).

अ. प्रिस्किल्ला आतिथ्यशील म्हणजे आदरातिथ्य करणारी होती.

- पौलाचे : ते स्वतःच करिंथ येथे निर्वासित म्हणून राहत होते, तरीपण पौलाच्या पहिल्या मिशनरी दौऱ्याच्या वेळी त्यांनी त्याला आसरा दिला.
- मंडळीचे : पौलाबरोबर इफिस येथे आल्यावर त्यांनी आपले घर उपासनेसाठी आणि विश्वासणाऱ्यांना शिष्य बनवण्यासाठी दिले.
- अपुल्लोसाचे : अपुल्लोला देवाच्या वचनाचे योग्य शिक्षण देण्याची गरज आहे हे त्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांनी त्याचे आदरातिथ्य केले.

अ. आदरातिथ्य हा ख्रिस्ती परोपकारकार्याचा महत्त्वाचा घटक आहे (रोम.१२:१२).

ब. आदरातिथ्य हे साध्यासुध्या दयाळूपणापेक्षा अधिक आहे. याचा अर्थ समाजातील अगदी शेवटच्या, कनिष्ठ व्यक्तीला सहभागितेत घेणे आणि देवाची महान प्रीती त्याला/तिला दाखवणे.

क. उपासना आणि शिष्य करणे यांच्याद्वारे महान आज्ञेची परिपूर्ती करणे यावर आतिथ्यशीलता केंद्रित आहे. सुवार्ताप्रसार आणि शिष्य बनवणे यासाठी घर हे महत्त्वाचे साधन आहे.

## ३. शिष्य बनवणारी ही गुणग्राहक, चाणाक्ष असावी (प्रे.कृ.१८:२४–२६).

अ. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला हे अपुल्लोच्या शिकवणीतील दोष ओळखू शकले.

- अपुल्लो हा धीट मनुष्य होता. येशूविषयी तो आवेशाने आणि अचूकपणे शिकवत होता, पण प्रिस्किल्ला व अक्विल्ला यांनी त्याचे भाषण ऐकले तेव्हा त्याच्या शिकवणीतील गंभीर दोष त्यांच्या लक्षात आला : त्याला केवळ योहानाचा बाप्तिस्मा माहीत होता.
- त्यांनी त्याला आपल्या घरी नेले आणि सत्याचे पूर्ण ज्ञान त्याला दिले.

ब. अनेक खोटे शिक्षक आणि शिकवणी येतील, पण चुका लक्षात याव्या आणि सत्याचे व्यवस्थित स्पष्टीकरण करता यावे यासाठी शिष्यांना देवाच्या वचनाची माहिती – अभ्यास असला पाहिजे (मत्तय.२४:११–१४).

क. भेद ओळखणे हे निरीक्षणापेक्षा अधिक आहे. हे आपल्याला देवाकडून पवित्र आत्म्याद्वारे होणारे सुज्ञता आणि सत्य यांचे प्रकटीकरण आहे.

## ४. शिष्य बनवणारी आपल्या वेळेचा त्याग करण्यास तयार असली पाहिजे (प्रे.कृ.१८:२४–२६).

अ. पौलाकडून शिक्षण घेतल्यावर प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला हे त्याच्याबरोबर सेवा करणारे मिशनरी झाले. त्यामुळे त्यांच्या व्यवसायासाठी द्यायचा बराचसा वेळ त्यांना यासाठी द्यावा लागला असेल.

ब. ते अपुल्लोला भेटले तेव्हा, त्याला देवाचा मार्ग अधिक अचूकपणे शिकवण्यासाठी ते आपला वेळ खर्च करायला तयार होते.

क. ते पौलाबरोबर इफिसला गेले तेव्हा आपले घर मंडळीसाठी उघडले. यासाठीदेखील त्यांना बराचसा वेळ द्यावा लागला असेल.

ड. शिष्यांनी शिष्यांची पुनःनिर्मिती केली पाहिजे. आपल्या पुनःनिर्माणाचे तीन पैलू आहेत : आपण लोकांना ख्रिस्ताकडे आणतो (त्यांना जिंकतो), देवाच्या वचनामध्ये त्यांची बांधणी, उभारणी करतो, आणि त्यांनी इतरांना शिष्य करावे म्हणून त्यांना पाठवतो. या सर्व गोष्टींसाठी पुष्कळ वेळ लागतो, ख्रिस्तासाठी हा वेळ देण्याची शिष्याची तयारी असली पाहिजे.

**५. शिष्य करणाऱ्याने कष्ट सहन करण्यास तयार असले पाहिजे (रोम.१६:३; प्रे.कृ.१८:२).**

अ. छळ आणि रोमन सम्राटाची क्रूर आज्ञा यांमुळे प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला यांना रोम सोडून जावे लागले, पण त्यामुळे त्यांच्या सेवाकार्याची व्याप्ती वाढली. त्यांनी किमान तीन वेळा स्थलांतर केले (रोममधून करिंथ, करिंथमधून इफिस आणि इफिसमधून रोमला). प्रत्येक वेळी बदलासाठी देव त्यांना जे पाचारण करत होता, त्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन, त्यांच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्ती आणि शहराच्या गरजा त्यांनी ओळखल्या व त्यानुसार कार्य केले.

ब. प्रिस्किल्ला आणि तिचा पती या दोघांनी शिष्य बनवण्याच्या सेवाकार्यात व्यस्त असताना तंबू बनवण्याद्वारे स्वतःचा उदरनिर्वाह केला. नोकरीव्यवसाय करून स्वतःचा उदरनिर्वाह करून सुवार्तिक आणि शिष्य बनवणारे होतील अशा ''तंबू बनवणाऱ्या'' ख्रिस्ती लोकांची आज आपल्यालादेखील गरज आहे. इतर कोणाकडूनही आर्थिक साहाय्य मिळाले नाही, तरी व्यक्ती सुवार्तिक होऊ शकते.

क. पौलाच्या सोबतीचे सहकारी म्हणून सेवा करत असताना, स्वतःचा जीव धोक्यात घालून पौलाचा बचाव करण्याची जबाबदारी त्यांना पार पाडावी लागली असावी असे वाटते. पौलाचा बचाव करताना, त्यांनी परराष्ट्रीयांकरिता असलेल्या प्रेषिताचा जीव वाचवला. म्हणून पौलाने म्हटले, ''सर्व परराष्ट्रीय त्यांचे आभारी आहेत.''

ड. शिष्यांनी हालअपेष्टांची अपेक्षा केली पाहिजे – त्या नक्की येतील. हालअपेष्टांसाठी आध्यात्मिकरित्या तयार असणे हे सेवाकार्यात टिकून राहण्यासाठी आवश्यक आहे.

**६. शिष्य बनवणाऱ्याने सेवाकार्यात इतरांसोबत भागी करण्यास तयार असले पाहिजे (रोम.१६ः३–४).**

अ. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला यांनी एकमेकांसोबत, पौलासोबत, अपुल्लोसोबत आणि तीमथ्यासोबत सेवा केली. त्यांनी निःस्वार्थीपणे स्वतःच्या अधिकाराचा वापर केला. प्रिस्किल्ला इतर पुरुषांसोबत, विशेषतः तिच्या पतीसोबत सहज काम करू शकत होती हे लक्षात घ्या. त्यांचे घट्ट वैवाहिक संबंध आणि व्यवसायातील भागीदारी हे इतर सर्व ख्रिस्ती लोकांसाठी चांगले उदाहरण होते.

ब. प्रिस्किल्ला आणि अक्विल्ला यांनी अपुल्लोचे संगोपन केले. नंतर तो ख्रिस्ताच्या सेवाकार्यात खूप यशस्वी झाला. शिष्य बनवणारे हे नवीन पुढाऱ्यांचे संगोपन करण्यासाठी, त्यांची बांधणी करण्यासाठी खुल्या मनाचे असले पाहिजेत, त्यांच्या यशाचा त्यांना मत्सर वाटू नये.

क. पतीसोबत किंवा इतर पुरुषांसोबत भागीमध्ये सेवा करत असताना पत्नीची भूमिका त्यांच्यापासून अधिकार हिरावून घेण्याची नसावी, तर त्यांच्या सेवाकार्याची वाढ करणारी, सेवाकार्याला उपयोगी असावी. सेवाकार्यात असणाऱ्या स्त्रीने इतर पुढाऱ्यांवर, विशेषतः पुरुष पुढाऱ्यांवर सार्वजनिकरित्या कधीही टीका करू नये.

ड. एकमेकांसोबत भागी आणि सहकार्य करणे हा देवाची प्रीती व्यक्त करण्याचा, मंडळी ही ख्रिस्ताचे शरीर आहे हे दाखवण्याचा मार्ग आहे. आपण देवाचे सहकारी आहोत यावर पौलाने जोर दिला (१ करिंथ.३ः५–९).

## चर्चेसाठी प्रश्न

१. चांगली शिष्य करणारी आतिथ्यशील असते. तुमचे घर चांगले नसले किंवा तुमच्याकडे पुष्कळ पैसे नसले तरीदेखील इतरांचे आदरातिथ्य तुम्ही कोणकोणत्या प्रकारे करू शकाल?

२. महान आज्ञेची परिपूर्ती करण्यासाठी चांगल्या शिष्यकर्त्याने आपल्या वेळेचा त्याग

करण्यास तयार असले पाहिजे. शिष्य बनवण्यासाठी तुम्हांला अधिक वेळ मिळावा म्हणून तुम्ही कोणकोणती कामे वेगळ्या पद्धतीने करू शकाल?

**प्रार्थना**

*प्रभूदेवा, मला चांगला शिष्यकर्ता/शिष्यकर्ती होण्यास मदत कर! तुझ्या वचनावर प्रीती करण्यास, इतरांसोबत चांगले नातेसंबंध ठेवण्यास आणि नवीन पुढाऱ्यांची जडणघडण करण्याच्या सेवाकार्यासाठी आवश्यक असणाऱ्या वेळेचा त्याग करण्यासाठी मला मदत कर. आमेन.*

## टिपा

# ११ विन आणि विनर्स

**मुख्य वचन : २ तीमथ्य.२:२**

*''ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या, त्या इतरांना शिकवण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे.''*

## प्रस्तावना आणि दृष्टान्त

### १. विन म्हणजे ''महिला प्रभाव नेटवर्क'' होय.

अ. अ. द असोसिएशन फॉर इंटरनॅशनल डिसायपलशिप ॲडव्हान्समेन्ट (एइडा) यांनी ''विन'' ही स्त्रियांची नवीन चळवळ सुरू केली आहे.

ब. ख्रिस्ती महिलांनी शिष्यत्वाच्या उद्दिष्टासाठी दर आठवडी एकत्र येण्यास चालना द्यावी हा या चळवळीचा हेतू आहे.

क. ''विन''च्या सूचनांचे पालन करून इतर महिलांना मार्गदर्शन करण्याच्या कार्यात सहभागी होणाऱ्या प्रत्येक स्त्रीला ''विनर'' म्हटले जाईल.

## २. विनचा दृष्टान्त

सखोल शिष्यत्वासाठी आवाहन मिळालेल्या, तसेच इतरांना शिष्या बनवण्यासाठी ज्या महिला सुसज्ज होतील, अशा महिलांसोबत गतीशील, आध्यात्मिक संघटनकार्य हाती घेण्यास कटिबद्ध असलेल्या ख्रिस्ती महिला पाहण्याचा दृष्टान्त महिला प्रभाव नेटवर्क पाहते.

## ३. मिशनकार्याचे निवेदन

अ. निवडलेल्या महिलांनी ख्रिस्ताच्या खऱ्या शिष्या व्हाव्या म्हणून स्वतःचे समर्पण/पुनःसमर्पण करावे म्हणून विन त्यांना शिखर परिषदांमध्ये विन आवाहन करील. आणि मग,

ब. या महिलांनी गतीशील, पवित्र शास्त्राधारित आध्यात्मिक संघटनकार्याच्या* योगे इतर महिलांना प्रभावित करावे यासाठी साहित्य आणि व्यावहारिक योजना यांच्याद्वारे त्यांना सुसज्ज करते, यासाठी की अविश्वासणाऱ्यांना ख्रिस्ताकडे आणावे, आणि समर्पित शिष्यत्वासाठी त्यांचे संगोपन करावे.

## ४. अभ्यासक्रम

विन शिष्यत्व मॅन्युअल (विन डिसायपलशीप मॅन्युअल – डीएम); शिष्यत्व, शिष्य बनवणे, सुवार्ताप्रसार, संघबांधणी यांविषयीच्या पाठांचे हे मॅन्युअल विन शिखरपरिषदांमध्ये अभ्यासक्रम ासाठी वापरले जाईल. तसेच ''विनर्स''नी त्यांच्या संघांची जडणघडण करण्यासाठीसुद्धा हे मॅन्युअल वापरले जाईल.

## ५. योजना

अ. या चळवळीमध्ये पुढारी म्हणून ज्या महिलांची शिफारस केली जाईल, त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी विभागीय पातळ्यांवर विनच्या शिखर परिषदा घेतल्या जातील.

ब. या परिषदांमध्ये सहभागी होणाऱ्या महिलांना वैयक्तिक शिष्यत्वासाठी विन शिष्यत्व मॅन्युअलचा वापर करून मार्गदर्शन केले जाईल.

क. महिलांनी त्यांच्या चर्चमधील आणि समाजामधील महिलांना शिष्य बनवण्याचा दृष्टान्त द्यावा म्हणून शिखरपरिषदांमध्ये त्यांना उत्तेजन देण्यात येईल. ज्या महिला विनर्स ३x३ मध्ये भाग घेतील त्यांना पहिल्या पिढीच्या ''विनर्स'' म्हटले जाईल.

---

**आध्यात्मिक संघटन ही अशी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये शिष्य किंवा शिष्या हे आध्यात्मिक शिस्तपालनाद्वारे (देवाच्या वचनाचे रोज मनन करणे, प्रार्थना, उपास, उपासना इ.) त्यांच्यामध्ये समर्पित शिष्यत्वासाठी आज्ञापालनाची वृत्ती वृद्धिंगत करावी म्हणून जाणीवपूर्वक पवित्र आत्म्याला अनुमती देतात.*

## ६. विनर्स ३x३ अभियान – विन संगोपन साखळी

अ. पहिल्या पिढीतील प्रत्येक विनर ही किमान तीन महिलांच्या टीमचे संगोपन करील आणि हाच दृष्टान्त (इतर तीन महिलांना ख्रिस्तासाठी जिंकून त्यांचे संगोपन करणे) त्यांच्या मनावर ठसवतील. या तीन महिलांना दुसऱ्या पिढीच्या विनर्स म्हटले जाईल.

ब. दुसऱ्या पिढीतील प्रत्येक विनर इतर तीन महिलांना मार्गदर्शन, संगोपन करून त्यांच्यामध्ये हा दृष्टान्त (इतर तीन महिलांना ख्रिस्तासाठी जिंकून त्यांचे संगोपन करणे) ठसवण्याचे कार्य पुढे चालू ठेवतील. या नवीन तीन महिलांना तिसऱ्या पिढीच्या विनर्स म्हटले जाईल.

क. आपापल्या मंडळ्यांची आणि पर्यायाने देवाच्या राज्याची वाढ घातांकी पद्धतीने करण्यासाठी संगोपनाची ही साखळी सर्व विनर्स चालवतील.

## ७. विन – पुढे चालू राहणारे सेवाकार्य

अ. प्रत्येक राज्यात त्या त्या राज्याच्या स्टेट को–ऑर्डिनेटरच्या नेतृत्वाखाली विनर्सचे जाळे तयार केले जाईल.

ब. विनची देशव्यापी असोसिएशन बनवण्यासाठी सर्व राज्यांचे को–ऑर्डिनेटर्स एइडाच्या विन डायरेक्टरच्या नेतृत्वाखाली कार्य करतील.

क. शिष्यत्वाविषयी पवित्र शास्त्रातील नवनवीन विषयांच्या आधारे ख्रिस्ती महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी राज्य आणि देशपातळीवर शिबिरे आयोजित करण्यासाठी विन हा एइडाचा मंच होईल. (विनचे साहाय्य होईल.)

ड. देवाची कृपा आणि मार्गदर्शन यांच्या साहाय्याने भारताबाहेर इतर देशांमध्ये विनचे सेवाकार्य विस्तारण्याचा दृष्टान्त एइडा पाहत आहे.

## सारांश

*''प्रिय विनर्स, ''तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा... जे काही मी तुम्हांला आज्ञापिले ते सर्व त्यांना पाळण्यास शिकवा'' (मत्तय.२८:१९–२०) ही प्रभूची महान आज्ञा पूर्ण करण्यासाठी चर्चमधील महिलांनी सेविका/कार्यकर्त्या व्हावे या आमच्या दृष्टान्तामध्ये सहभागी होण्यासाठी तुमचे स्वागत आहे. त्याच्या पाचारणासाठी तुम्ही*

*प्रार्थनापूर्वक तयार होऊन स्वतःचे समर्पण करीत असताना, आम्हीही तुमच्यासाठी प्रार्थना करतो याची खात्री बाळगा. देवाच्या कृपेने आपण पुढे वाटचाल करू या.''*

*– विन दृष्टान्त पाहणारे*

## चर्चेसाठी प्रश्न

१. ''आध्यात्मिक संघटन'' याचा अर्थ काय?

२. आध्यात्मिक संघटनकार्यात तुम्ही सध्या कशा प्रकारे सहभागी आहात आणि तुम्ही विनमध्ये सहभागी झाल्यामुळे त्यात कसा फरक पडेल?

३. ''विनर्स ३ x ३'' म्हणजे काय हे तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

## प्रार्थना

*प्रभू, मला विश्वासू विनर बनव. विन शिष्यत्व मॅन्युअलच्या मदतीने तुझ्या वचनातून मी जे काही शिकले त्यानुसार मला ख्रिस्ताची खरी शिष्या बनव. ज्या विश्वासू स्त्रिया नंतर इतर स्त्रियांना शिकवू शकतील त्यांना हे शिक्षण देण्यासाठी माझे साहाय्य कर. आमेन.*



# १२ विन गटाचे नेतृत्व करणे

**मुख्य वचन : १ करिंथ.२:१३**

*''ते आम्ही मानवी ज्ञानाने शिकवलेल्या शब्दांनी नव्हे तर आत्म्याने शिकवलेल्या शब्दांनी, आध्यात्मिक गोष्टींबरोबर आध्यात्मिक गोष्टींची संगती लावून सांगतो.''*

## प्रस्तावना

विन – महिला प्रभाव नेटवर्कचा दृष्टान्त काय आहे हे आपण ११ व्या पाठात पाहिले. विन गटाचे नेतृत्व नक्की कसे करावे हे या पाठात शिकणार आहोत.

## विन गटाचे नेतृत्व कसे करावे

**१. दर आठवडी एकत्र येण्यासाठी एखादे ठिकाण आणि वेळ निश्चित करा.**

अ. शक्य असेल तर तुमच्या घरी एकत्र जमा; शिष्य बनवण्यासाठी प्रिस्किल्लाने वापरलेल्या पद्धतींमध्ये आदरातिथ्य ही एक पद्धत होती हे लक्षात ठेवा (प्रे. कृ.१८:२६).

ब. निकडीची परिस्थितीशिवाय इतर कधीही सभा चुकवू नका. तुमच्या गटातील लोकांनी ही वेळ अतिशय महत्त्वाची आहे हे लक्षात घेऊन कोणत्याही परिस्थितीत ती वेळ सभेसाठी राखून ठेवावी असे त्यांना सांगा (इफिस.५:१६). विश्वसनीयतेचा आदर्श ठेवा.

क. वेळ किंवा ठिकाण बदलण्याची गरज पडलीच, तर तुमच्या गटातील सर्व लोकांना याविषयी शक्यतो अगोदरच कळवण्याची खबरदारी घ्या.

ड. भौतिक किंवा सांसारिक चिंताकाळज्यांनी शिष्यांचे लक्ष विचलित होऊ नये असे सुखदायी वातावरण ठेवा. प्रत्येक शिष्येशी तुम्हांला सहजपणे संवाद

साधता यावा म्हणून त्यांच्याशी आपुलकीने वागा.

इ. लक्ष विचलीत करणाऱ्या गोष्टी जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न करा. सभेच्या वेळी मुलांची किंवा घरातील इतर सभासदांची काळजी घेण्याची व्यवस्था कदाचित करावी लागेल.

## २. तयार राहा.

अ. शिष्यत्व मॅन्युअलमधील जो पाठ तुम्ही शिकवणार आहात, त्याची तयारी अगोदरच करा (२ तीमथ्य.२:१५).

ब. पाठाशी संबंधित असणारे शास्त्रभाग लवकर सापडावेत म्हणून तुमच्या पवित्र शास्त्रात त्यांवर खुणा करून ठेवा.

क. तुम्हांला शिकवण्यासाठी उपयुक्त होतील अशी टिपणे काढा.

ड. तुमच्याकडील शिक्षणसाहित्याचा तुम्हांला आढावा घेता यावा म्हणून विन गटाच्या सभेपूर्वी वेळ काढा.

इ. चांगले उदाहरण किंवा कित्ता व्हा; तुमची चांगली तयारी असेल, तर सभेसाठी आपणही चांगली तयारी करायला हवी हे तुमच्या शिष्यांच्या लक्षात येईल (२ तीमथ्य.४:२).

## ३. सभेची सुरुवात आणि शेवट प्रार्थनेने करा.

अ. यामुळे सभेसाठी चांगली वातावरण निर्माण होते, आणि शिष्यांना येशूवर लक्ष केंद्रि करण्यास मदत होते (इब्री.१२:२).

ब. ही प्रार्थनासभा नाही हे लक्षात ठेवा. तुमच्या विन गटामध्ये, पाठ शिकण्यासाठी आशीर्वाद मिळावा आणि त्यायोगे समर्पित शिष्यत्वामध्ये वाढ व्हावी यावर प्रार्थना केंद्रित असावी. खऱ्या शिष्यत्वाला अडळखण होणाऱ्या गोष्टी दूर केल्या जाव्यात, तसेच प्रत्येक स्त्रीने तिच्या ख्रिस्ती जीवनात प्रभावी असावे म्हणून प्रार्थना करा.

क. जर कोणाला प्रार्थनेची तातडीची गरज असेल, तर सभा झाल्यावर तिच्यासोबत प्रार्थना करण्यासाठी वेळ काढा.

ड. तुमच्या समाप्तीच्या प्रार्थनेमध्ये, महिलांनी घरी जाऊन साक्ष देताना व शिष्य करताना त्यांना अधिक फळ मिळण्याचा आशीर्वाद मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

इ. तुमच्या विन गटातील महिलांसाठी, तसेच त्यांच्या विशेष विनंत्या व गरजांसाठी आठवडाभर प्रार्थना करा (इफिस.६:१८). तसेच त्यांनी तुमच्यासाठी व एकमेकींसाठी प्रार्थना करावी म्हणून त्यांना उत्तेजन द्या.

## ४. नवीन पाठ शिकवण्यापूर्वी जुन्या पाठाची उजळणी करा.

अ. पुनरावृत्ती ही शिकण्याची गुरूकिल्ली आहे.

ब. मागच्या आठवड्यात आपण काय शिकलो हे महिला सांगू शकतात की नाही हे पाहा; जर त्यांना सांगता येत नसेल, तर तुमच्या शिकवण्याच्या पद्धतीत बदल किंवा सुधारणा करण्याची गरज आहे.

क. आपण जे शिकलो ते आचरणात कसे आणले हे सांगण्याची संधी शिष्यांना द्या. त्यांनी मिळवलेल्या विजयाचा आनंद करा, तसेच त्यांच्यासमोर आव्हानांविषयी कळकळ दाखवा (रोम.१२:१५).

## ५. आपण उपदेशक नाही, तर शिक्षक आहोत हे लक्षात ठेवा.

अ. तुम्ही विन शिष्यत्व मॅन्युअलमधून शिकवाल, पण तुमचे शिकवणे हे इतरांचा व्यत्यय नसलेल्या उपदेशाप्रमाणे होऊ देऊ नका.

ब. शिष्यांना प्रश्न विचारण्याची आणि त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी वेळ द्या. त्यांची काय मते आहेत, आणि त्यांना काय वाटते हे त्यांना विचारा.

क. त्यांच्या कल्पनांमध्ये तुम्हांला सौम्यतेने सुधारणा कराव्या लागल्या, तरी त्यांचा आदर करण्याचा प्रयत्न करा (इब्री.५:२).

ड. शिष्येची कधीही थट्टा करू नका, किंवा तिला पेचात टाकून गोरीमोरी होऊ देऊ नका (फिलिप्पै.२:३).

## ६. विषय सोडून भरकटू नका.

अ. सभेला येणाऱ्या सर्वांना सहभागी होण्यास उत्तेजन दिले जाते, तेव्हा पाठाशी संबंधित नसणाऱ्या गोष्टींविषयी चर्चा करण्याची सुरुवात सहजपणे होऊ शकते.

ब. असे घडेल तेव्हा, गटाला पुन्हा मूळ विषयावर परत आणा – विन शिष्यत्व मॅन्युअलमधील विषय किंवा मुद्द्यांवरच तुम्हांला त्यांचे लक्ष केंद्रित करायचा आहे हे लक्षात ठेवा.

क. ज्यावर चर्चा होत आहे ती गोष्ट किंवा तो विषय महत्त्वाचा आहे असे वाटले, तर सभा संपल्यावर संबंधित व्यक्तीशी बोलण्याचा प्रयत्न करा.

ड. संभाषणात कोणा तरी एकाच व्यक्तीचे वर्चस्व होऊ देऊ नका. प्रत्येकजणीला चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळावी म्हणून गरज असेल, तर सौम्यपणे हस्तक्षेप करा (रोम.१२:१०).

## सारांश

विनर्स ३x३ शी तुमची समर्पितता ही या सेवेच्या यशासाठी आवश्यक आहे. ही भूमिका निभावणे ही गंभीर पण देवासोबर आनंददायक जबाबदारी आहे. यशस्वी होण्यासाठी लागणारी दाने तुम्हांला देऊन तो तुम्हांला सुसज्ज करील. देवाने ज्यांना सेवेसाठी पाचारण केले आहे, त्यांना तो त्याचे हेतू पूर्ण करण्यासाठी नक्कीच सक्षम करील.


## चर्चेसाठी प्रश्न

१. मागच्या सभेतील पाठाची उजळणी करणे हे शिकण्यासाठी का महत्त्वाचे आहे?

२. तुमच्या अभ्यासाच्या वेळी विन गटाचे लक्ष ''विषयावर'' केंद्रित करण्यासाठी, पुढारी म्हणून तुम्ही कोणकोणत्या गोष्टी करू शकता?

## प्रार्थना

*प्रभूदेवा, तू मला शिष्य बनवण्यासाठी, आणि विन गटाची पुढारी होण्यासाठी पाचारण केले आहेस असा माझा विश्वास आहे. प्रभावी मार्गदर्शिका होण्यासाठी आवश्यक असणारे ज्ञान, संयम, संवेदनशीलता आणि उत्साह माझ्यामध्ये असावा म्हणून मला मदत कर. शिष्यत्वाच्या जबाबदारीसाठी आम्ही स्वतःला समर्पित करत असताना आम्ही सुज्ञतेमध्ये वाढावे म्हणून आम्हांला साहाय्य कर. आमेन.*



# समर्पण

## विनर्स ३X३ अभियान

प्रती : इतर तीन स्त्रियांसोबत गतिमान आध्यात्मिक संघटन करण्यासाठी तयार असलेल्या ख्रिस्तशिष्येसाठी पुढे काही सूचना दिल्या आहेत :

१. जेणेकरून ज्या तीन महिला शिष्य करण्यासाठी सक्षम होतील, अशा कोणत्या तीन महिलांची निवड करावी यासाठी प्रार्थनेद्वारे देवाकडे मार्गदर्शन मागा.

२. अर्थपूर्ण शिष्यत्वासाठी देवाने त्यांची अंतःकरणे तयार करावी म्हणून संपूर्ण आठवडाभर रोज त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

३. सखोल शिष्यत्वाची आवश्यकता काय हे तुम्हांला देवभीरूपणाने वाटणाऱ्या काळजीने आणि पवित्र धैर्याने सांगता यावे म्हणून त्यांची व्यक्तिशः भेट घ्या.

४. त्यांच्यासोबत प्रार्थना करा आणि तुमच्यासोबत व इतर दोघींसोबत शिष्यत्व मॅन्युअलमधून शिकण्यासाठी त्यांची सहमती घ्या.

५. तुमच्या विन गटामध्ये साप्ताहिक शिष्यत्वासाठी समर्पण आणि प्रार्थनेसाठी तिघींना एकत्र बोलवा.

६. तिघीहीजणी समर्पित शिष्या व्हाव्यात, आणि त्यांच्यापैकी प्रत्येकजणीने इतर तीनजणींसोबत विन शिष्यत्व गट सुरू करण्याचा निश्चय करावा म्हणून विन शिष्यत्व मॅन्युअलमधील शिक्षण प्रार्थनापूर्वक संपवा.

## प्रभू, माझी खात्री झाली आहे की,...

१. माझ्या आणि माझ्या शेजाऱ्यांच्या पापांसाठी तू वधस्तंभावर मरण पावलास (''आपण पापी असतानाच ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला'' रोम.५:८).

२. मी विश्वासाने तुझ्याकडे आले तेव्हा तू माझे तारण केलेस, तसेच माझे शेजारी तुझ्याकडे वळले तर तू त्यांचेही तारण करशील (पाहा, मी दाराशी उभा आहे व दार ठोकत आहे; जर कोणी माझी वाणी ऐकून दार उघडील, तर मी त्याच्याजवळ आत जाईन व त्याच्याबरोबर जेवेन, आणि तो माझ्याबरोबर जेवेल'' (प्रकटी.३:२०).

३. तू माझे तारण केल्यामुळे, माझ्या शेजाऱ्यांचे तारण व्हावे म्हणून त्यांना तुझ्याकडे आणण्यासाठी मी त्यांना तुझी साक्ष दिली पाहिजे (''...मी तुम्हांला निवडले व तुम्हांला नेमले आहे; ह्यात हेतू हा की, तुम्ही जाऊन फळ द्यावे...'' योहान.१५:१६).

४. मी तुझ्या वचनात राहिले, तर मी तुझी खरी शिष्या होईन (''तुम्ही माझ्या वचनात राहिलात तर खरोखर माझे शिष्य आहात...'' योहान.८:३१).

५. शिष्य करणे ही तू माझ्यावर सोपवलेली महान कामगिरी आहे (''तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांना शिष्य करा...'' (मत्तय.२८:१९).

६. तुझी अशी इच्छा आहे की, मी इतर तीन स्त्रियांसोबत अशी आध्यात्मिक रचना करावी की, त्या तीन स्त्रिया इतर तीन स्त्रियांना शिष्या करण्यासाठी समर्पित होतील, आणि त्यांच्यासोबत विन गटांची स्थापना करतील (''म्हणून तुम्ही एकमेकांचे सांत्वन करा व एकमेकांची उन्नती करा'' १ थेस्सल.५:११).

७. महान कामगिरीमधील हरवलेल्यांना जिंकणे आणि त्यांना शिष्य करणे या दोन जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी मी ताबडतोब सुरुवात आणि प्रार्थना करावी (''...रात्र येणार आहे, तिच्यात कोणालाही काम करता येणार नाही'' योहान.९:४).

८. मी तुला आणि या सेवाकार्याला जबाबदार असणारी विश्वासू विनर होईन असा करार मी पवित्र आत्म्यावर अवलंबून राहून दृढतापूर्वक करावा. याला मान्यता देण्यासाठी मी माझा हात पुढे करत आहे.

**सही :** ______________________________

**तारीख :** ______________________________

***ख्रिस्ताच्या शिष्या व्हाव्यात म्हणून ज्या तीन स्त्रियांचे मी संगोपन करणार आहे त्यांची नावे :***

१. ______________________________

२. ______________________________

३. ______________________________

# परिशिष्ट

## उपयुक्त वेबसाइट्स

**http://coregroups.org**.
Core Discipleship. Resources for discipleship groups.

**http://www.telintl.org.**
Training Evangelistic Leadership. Books and resources for sale.

**http://www.navigators.org.**
Navigators. Resources for discipleship and Bible studies.

**http://www.gospelcentereddiscipleship.com.**
Articles and resources on discipleship.

**http://www.discipleshiplibrary.com.**
Audio and pdf articles and curriculum on discipl

**http://www.disciplers.org.**
Free discipleship lessons.

## आशादायक सेवाकार्य

प्रभावीपणे आत्मे जिंकणारी महिला होता यावे
यासाठी एखाद्या विशिष्ट सेवाकार्यासाठी (मिनिस्ट्री) तुम्ही देवाकडे मार्गदर्शन मागत असाल, तर एइडाचा स्त्रियांसाठी आशादायक सेवाकार्यांविषयी माहिती मागवण्यासाठी विन/एइडाच्या कार्यालयाशी संपर्क साधा. संपर्कासाठी आमचा पत्ता पुढीलप्रमाणे :

Address: AIDA
C-1/1493, Vasant Kunj,
New Delhi-110 070, INDIA

E-mail: *shantarawate@yahoo.in*

Phone: *011-26122930, or 9971671627*